|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ३० सोमवार दि. १७ जुलै २०२३ ते रविवार दि. २३ जुलै २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## सात मुलांच्या आईचा तोल गेला प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केला

जालना/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध हे घातक असतात, तर ते उघडकीस आले तर त्यातून काहीही घडू शकते. जालना येथील अशाच एका घटनेत अनैतिक संबंधामुळे एका इसमाला आपला जीव गमावा लागला. विशेष म्हणजे त्याची हत्या त्याच्या पत्नीनेच केली. या प्रकरणी आरोपी पत्नीला अटक करण्यात आली आहे.

प्रमोदच्या पत्नीने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी जालना जिल्ह्यातल्या वाळूज परिसरातून त्या महिलेला ताब्यात घेतलं. तिच्याकडे चौकशी केली असता आपले प्रेमसंबंध ...पान २ वर

# पैशांसाठी शिष्याकडून भयंकर पाप झाले जैन मुनीला ठार मारून नऊ तुकडे केले

चिक्कोडी/क्राईम रिपोर्टर



साधू संत हे धर्म संस्कृतीचे रक्षक असतात. तसेच ते समाजाला दिशा दाखवणारे समाजाचे मार्गदर्शक सुद्धा असतात. साधू संतांचा मठ असो वा आश्रम तेथे माणसाला अध्यात्माची शिकवण दिली जाते. देव, धर्म, संस्कृती, विद्या आणि सरळमार्गी जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन केले जाते आणि हे पवित्र कार्य करणारे जे साधू संत आहेत. त्यांनी भौतिक सुखाचा त्याग करून वैराग्य पत्करलेले असते. आणि त्यातून आपले संपूर्ण जीवन धर्मसंस्कृती आणि समाजाच्या मानसिक आरोग्यासाठी वाहून घेतलेले असते. त्यांच्याकडे स्वतःचं असं काहीच नसत किंवा त्यांना मोहमायेची आसक्ती नसते. आज हिंदू तसेच जैन धर्मात असे किती तरी साधू संत आहेत ज्यांनी भौतिक सुखाचा त्याग करून समाजासाठी वैराग्य पत्करलेले आहे आणि देशभरातील मंदिरे, मठ, आश्रम यामधून वास्तव्य करून ते प्रवचनातून समाजाला धर्मसंस्कृतीचे ज्ञान देत आहेत. अशा विद्वान साधू संतांचे भक्तगणही मोठ्या संख्येने आहेत आणि या भक्तांना वेळोवेळी साधू महतांकडून मदत दिली जाते. जैन धर्मातील साधुमुनीचे वैराग्य तर खूपच कठीण असते. त्यांनी स्वतःवर वेगवेगळे निर्बंध घालून घेतलेले असतात. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी वाहून घेतलेले असते. त्यामुळे जैन मुनी असोत कि जैन साध्वी असोत त्या सात्विकतेचे प्रतिक आहेत आणि त्यांच्याकडून शिष्यांना वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारची मदतही मिळत असते. पण काही शिष्य आपल्याच गुरूशी बेईमानी करतात. चिक्कोडी जवळच्या हिरेकुडी गावातील आश्रमात राहणाऱ्या आचार्य काम कुमार नंदी महाराज यांनी त्यांच्या शिष्याला अडचणीच्या काळात मंदिरातील दानातून १ लाख रुपये उसने दिले होते. पण हे पैसे तो शिष्य परत करीत नव्हता आणि याच पैशाच्या वादातून त्या शिष्याने आपल्या साथीदाराच्या मदतीने कामकुमार नंदी महाराज यांची गळा दाबून हत्या केली. हा नराधम एवढ्यावरच थांबला नाही, तर त्यांनी मृतदेहाचे ९ तुकडे करून त्याची विल्हेवाट लावली. याप्रकरणी पोलिसांनी नारायण माली नावाच्या शिष्याला आणि त्याच्या साथीदाराला अटक केली आहे.





हिरेकुडी हे चिक्कोडी जवळील लहानसे गाव होय. या गावात जैन समुदायाची लोकसंख्या जास्त असल्याने या गावाला जैनी गाव म्हणून ओळखले जाते. येथील जैन आश्रमाचे मुनी आचार्य श्री १०८ कामकुमार नंदी महाराज हे दि.५ जुैलपासून बेपत्ता होते. दोन चार दिवस झाले तरी त्याचा आश्रमात दिसेनासे झाल्यावर आश्रमात एकच त्याच्या श्रावक श्राविकात चर्चा होऊ लागली. मुनी महाराज हे न सांगता कुठे गेले. गेले ते गेले परंतु त्यांनी जाताना कोणाला काहीच कसे नाही बोलले या विषयी तर्क विर्तक होऊ लागले. आश्रमात दररोज भाविक त्यांच्या दर्शनासाठी येत होते. तेच या आश्रामाचे मुख्य होते. काही भाविकांना त्याच्या बेपत्ता होण्याची शंका येऊ लागल्याने त्यांनी त्याच्या आश्रमातील खोलीत डोकावून पाहिले असता त्याच्या खोलीत त्याचे कमंडूल आणि मोबाईल तेवढेच होते.त्यामुळे भाविकांना त्याच्या विषयी वेगळीच शंका आली. त्यांनी मुनी महाराज कामकुमार नंदी हे बेपत्ता असल्याची फिर्याद चिक्कोडी पोलीसात नोंदविली. चिक्कोडी पोलीस त्याचा शोध घेत असताना मुनी महाराज कामकुमार नंदी महाराज यांची हत्या झाल्याचे त्याच्या ...पान २ वर

# ‘लव्ह स्टोरी’चा भयंकर शेवट झाला बापाने मुलीचा निर्घृणपणे खून केला

विटा/क्राई रिपोर्टर



मयत श्रेया जाधव

आई-वडील नेहमीच मुलांच्या भवितव्याचा विचार करीत असतात. खास करून मुलगी असेल तर तिच्या बाबतीत पालक खूप गंभीर असतात. आपल्या मुलीला चांगला पती मिळावा आणि तिचा संसार सुखाचा व्हावा हीच त्यामागची भावना असते. पण आजकालची मुले आई वडिलांचे ऐकत नाहीत. मंगरूळ चिंचणी येथे राहणारी श्रेया ही तरुणी आपल्या नात्यातल्याच मुलाच्या प्रेमात पडली होती. त्यामुळे आई वडिलांनी आणलेल्या स्थळांना नकार देत होती. या गोष्टीचा तिच्या बापाला भयंकर राग होता आणि याच रागाच्या भरात त्याने मुलीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.



आरोपी संतोष जाधव

मंगरूळ चिंचणी येथे संतोष जाधव हे आपल्या पत्नी मुलीसह राहयला आहेत. त्याची १७ वर्षीय मुलगी श्रेया ही विटा येथील नामवंत कॉलेजच्या पहिल्या वर्षात शिकायला आहे.श्रेया ही दिसायला सुंदर आणि देखणी असल्याने तारूण्य सुलभ भावनेने ती नात्यातीलच एका मुलाच्या प्रेमात पडली. तो मुलगा ती कॉलेजला जात येत असताना कायम तिच्याबरोबर राहत होता. त्याला ती आवडत असल्याने तो ही तिच्यावर प्रेम करीत होता. मेड फॉर इच आदर अशी त्याची जोडी होती. गेल्या दोन तीन वर्षापासून ते दोघे ही एकमेकांच्या प्रेमात होते. अलिकडे श्रेयाच्या लग्नाची घाई घरातील तिचे आई वडिल करीत होते. याला कारण ही तसेच होते.कुठून तरी त्यांना श्रेयाच्या प्रेमप्रकरणाविषयी कळालेले होते. त्यातच तिला पाहयला नात्यातील एक दोन स्थळे ही येवून गेली होती. त्यातील एक स्थळ श्रेयाचे वडिल संतोष जाधव यांना योग्य वाटत होते. या स्थळाबाबत त्यांनी अनकुलता दर्शवली होती. त्यामुळे तिच्या घरात तिच्या लग्नाची चर्चा चालली होती. श्रेयाच्या आई वडिलांनी श्रेयाला हा मुलगा पंसत आहे का नाही असे विचारले होते. परंतु तिने अजून आपण शिकणार आहे मला करियर करायचे आहे असे सांगून त्या स्थळाला नकार दिला होता. तिने का नकार दिला आहे हे समजण्या इतपत तिचे आई वडिल दूध खुळे नव्हते. त्यांना तिचे प्रेमप्रकरण माहित होते. ती नात्यातील ज्या मुलाबरोबर प्रेम करीत होती त्या मुलाची आर्थिक आणि कौटुंबिक परिस्थीती खराब होती. शिवाय संतोष जाधव यांना आपली मुलगी जवळच्या नात्यात दयावयाची नव्हती. त्याना बाहेरचे नविन पाहुणे जोडायचे होत. त्यासाठी ते श्रेयाला बाहेरची स्थळे दाखवित होती. जी जी स्थळे तिला पाहयला येतील त्याला श्रेया काही तरी कारण सांगून नकार देत होती. ही बाब संतोष ...पान २ वर

## भावाला त्याचे नातेही नाही दिसले दारूसाठी त्याने बहिणीचे कुंकू पुसले

संभाजी नगर/क्राईम रिपोर्टर



मयत रणजीत

दारूच्या व्यसनाच्या आहारी गेलेला माणूस दारूसाठी कोणत्याही थराला जातो. कारण एखादे दिवशी जरी त्याला दारू मिळाली नाही तरी तो अस्वस्थ होतो. त्या अस्वस्थतेचे परिणाम त्याच्या मनावर आणि शरीरावर जाणवू लागतात आणि मग त्यातून दारूसाठी काहीही करायची त्याची तयारी असते. दारूसाठी तो एखाद्याचा जीवही घेऊ शकतो. संभाजी नगरमध्ये दारूसाठी पैसे दिले नाहीत म्हणून एका इसमाने त्याच्या बहिणीच्या पतीची निर्घुणपणे हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक केली आहे.

रणजीत अंकुश माळी असे मयताचे नाव असून नंदू गायकवाड असे आरोपीचे नाव आहे. या दोघांमध्ये पैशावरून जोरदार भांडण आणि शिवीगाळ सुरू झाली यातच आरोपी नंदू ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता तुला जास्त मस्ती आली तुझा काटा काढतो अशी धमकी दिली. धमकीनंतर दोघांमधील वाद विकोपाला गेला आणि आरोपीने कुऱ्हाड काढली आणि मेहुण्याच्या मानेवर दोन-तीन वार केले. यानंतर आरोपी नंदू याने डोंगराच्या दिशेने पळ काढला. मृत व्यक्तीचं नाव रणजी असल्याची माहिती मिळाली ...पान २ वर

## धमकीमुळे दोघांमधला वाद वाढला दारू पाजून अरबाजचा काटा काढला

बेळगावी/क्राईम रिपोर्टर

आजकालच्या तरुण मुले शाळा कॉलेजात असतानापासूनच मित्रांच्या नादाने कुठल्याना कुठल्या व्यसनाच्या आहारी जातात. आणि पुढे हेच व्यसन त्याच्या बरबादीचे कारण बनते. दारूचे व्यसन हे तर भयंकरच असते. दारूच्या नशेत वाद विवाद होतात आणि त्यातून एखाद्याचा जीवही जातो. बेळगावी येथील ३ महाविद्यालयीन मित्रांमध्ये असेच झाले. एकदा हे तिघे दारू प्यायला बसले होते. नशा होताच त्यातील अरबाज व प्रसाद यांच्यात हाणामारी झाली. यावेळी अरबाजने प्रसादला ठार मारण्याची धमकी दिली होती. तो आपल्याला ठार मारण्या अगोदर आपणच त्याचा काटा काढावा असे ठरवून प्रसादने दारूची पार्टी अरेंज केली. त्यात अरबाजला बोलावले आणि त्याला दारू पाजून त्याचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



बेळगावी जवळील पिरनवाडी येथील हैदरअली चौकात अरबाज रफिक मुल्ला हा आपल्या आई वडिलास राहयला आहे. त्याचे आई वडिल हे दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करतात. अरबाज हा चांगला शिकून मोठा व्हावा त्याने त्याच्या पायावर उभे राहवे म्हणून त्याचे आई वडिल काबाड कष्ट करीत होते. अरबाज हा शिक्षणात हुशार असल्याने तो बेळगावी येथील एका मोठया कॉलेजात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होता. हुचेनहट्टी येथील प्रशांत वड्डर आणि प्रसाद कळवेकर याच्या बरोबर त्याची चांगली मैत्री होती. ते दोघे ही बेळगावी येथील ...पान २ वर

## जमिनीचा वाद प्राणघातक ठरला सासऱ्यानेच सुनेचा गळा चिरला

नाशिक/क्राईम रिपोर्टर




जमिनीचे वाद लवकर मिटवायचे असतात. कारण हे वाद लवकर मिटले नाहीत तर त्यातून एखाद्या माणसाच्या प्राणावर बेतू शकते. खास करून कुटुंबातील जमिनीचे वाद खूप भयंकर असतात. अशा वादात लोक नात्यागोत्याचाही विचार करीत नाहीत. मुळ मध्य प्रदेशातील असलेले पण कामानिमित्त सातपूरा येथे राहणाऱ्या एका इसमाने जमिनीच्या वादातून झालेल्या भांडणात आपल्या चुलत सुनेची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

शनीदयाल रामजियामन बैगा (वय ३०) हा मुळचा मध्यप्रदेशातील तरुण कामधंद्यानिमित्त नाशिक शहरात आला होता. तो सात ते आठ महिन्यापासून सातपूर गावातील विघाते गल्लीतील आनंद रघुनाथ नाठे यांच्या घरात रहात होता. सातपूर एम. आय. डी. सी. भागातील जे. बी. एम. कंपनीत तो रोजंदारीने काम करत होता. त्यातून होणाऱ्या कमाईवर तो आपल्या कुटुंबाची उपजिविका करत होता. त्याची पत्नी आशोक्तीबाई (वय २९) हिच्यासोबत १४ वर्षापूर्वी ...पान ६ वर

## वाळूमाफियाच्या नादी लागून फसला शेतकरी आपला जीव गमावून बसला

नाशिक/क्राईम रिपोर्टर




मयत रविंद्र चौधरी

महाराष्ट्रात वाळू माफियांनी हैदोस घातला आहे. वास्तविक त्यांचे प्रशासनातील अधिकारी आणि पोलिसांबरोबर साटेलोट असल्याने ते कोणालाही घाबरत नाहीत. मालेगाव मधील रितेश डाबली हा सुद्धा त्यापैकीच होता. त्याची संपूर्ण मालेगावात दहशत होती. याच दहशतीच्या जोरावर त्याने आपला वाळू चोरी तसेच खनिज चोरीचा धंदा वाढवला होता. पण एकदा एका शेतकऱ्याने त्याचे काम थांबवले असता वाळू माफियाच्या हस्तकांनी त्या शेतकऱ्याची हत्या केली. या प्रकरणी वाळूमाफिया आणि त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे.

सध्या राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात वाळू तस्करांची मुजोरी भलतीच वाढली असल्याचे दिसून येत आहे. महसुल प्रशासनाच्या छुप्या आशिर्वादाने हा सर्व प्रकार होत असल्याचे लोक आता खुलेआम बोलू लागले आहेत. वाळू तस्करांची मुजोरी एवढी वाढली आहे की ते एखाद्याचा खून करण्यास देखील मागेपुढे बघत नाहीत. रविंद्र शंकर चौधरी (वय ४२) हा मालेगाव कॅम्पातील जाजूवाडी भागात आपल्या आई-वडील, भाऊ अशा एकत्रित कुटुंबात रहात होता. त्याची डाबली, ता. मालेगाव शिवारात शेती असल्यामुळे कॅम्पातून डाबली येथे शेती व्यवसायासाठी त्याला सतत ये-जा करावी लागत असे, तर डाबली गावासह परिसरात रितेश भाऊसाहेब निकम रा. डाबली, ता. मालेगाव याने वाळू व गौण खनिज चोरीचा व्यवसाय सुरू केला आहे. तो वाळू माफीया म्हणूनच ओळखला जातो. वाळू व इतर गौण खनिज चोरी करण्याच्या व्यवसायासाठी त्याने सात ते आठ जण आपल्या दिमतीला ठेवले आहेत. रितेश डाबली व परिसरातील वाळू, मुरूम, माती वगैरेची बिनधास्तपणे व दादागिरीने चोरी करायचा, त्यामुळे त्याची परिसरात दहशतच निर्माण झाली होती. शासनाचा महसूल बुडवायचा, पण कोणीही त्याला अटकाव करू शकत नव्हता. एवढी दहशत त्याने निर्माण केली होती. रविंद्र शंकर चौधरी हा नेहमीप्रमाणे मालेगाव कॅम्प येथून डाबली येथे आपल्या शेताकडे निघाला. रस्त्याने तो जात असतांना डाबली शिवारात असलेल्या धरण परिसरातून रितेश ...पान ६ वर

## ओळखीचा गैर फायदा घ्यायला गेला मित्रांच्या हातून अखेर स्त्रीलंपट मेला

नवी मुंबई/एस.कुमार



वासनेच्या आहारी जावून आजकाल माणूस व्यभिचारी बनत चालला आहे. अशावेळी काही नराधम आपल्याच नात्यातील महिलांवर किंवा मित्राच्या घरातील महिलांवर वाईट नजर ठेवतात. पण त्यांच्या नजरेतला हा विकार कधीतरी त्यांच्यासाठी प्राणघातक ठरतो. नवी मुंबईतील एरोलीमध्ये राहणाऱ्या जितेश बनसोडे याची त्याच्या मित्राच्या बहिणीवर वाईट नजर होती. मात्र ही गोष्ट त्याच्या मित्राला कळताच तो संतापला आणि त्याने आपल्या एका साथीदाराच्या मदतीने जितेश बनसोडे याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



वपोनि संभाजी कटारे



पोनि एस.एन.गवते

वाशी लोहमार्ग पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन दराडे हे दिवसपाळीला कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असताना सकाळी ९ वाजता त्यांना वाशी स्टेशन मास्टर यांचा फोन आला आणि त्यांनी सांगितले की, वाशी रेल्वे स्टेशन ते सानपाडा रेल्वे स्टेशन दरम्यान ब्रिजखाली एक अज्ञात व्यक्ती मृतावस्थेत पडलेला आहे. ही माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन दराडे हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, किमी. नं. २२/०९ ते २९/१० चे दरम्यान वाशी रेल्वे स्टेशन पासून सानपाडा रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या रेल्वे पटरीकडे सुमारे ३०० मिटर अंतरावरील खोदकाम केलेल्या खड्यात एक पुरुष जातीचा मृतदेह अंदाजे वय २८ ते ३० वर्षे, पूर्वेस डोके व पश्चिमेस पाय असा मयत अवस्थेत पडलेला होता, सदर व्यक्तीच्या डाव्या डोळ्याच्या भुवईवर उजवे गालावर डाव्या ओठावर व हनुवटीवर जखमा झालेल्या असून चेहरा रक्ताने माखलेला व त्याचे छाती, डोक्याजवळ दगड पडेलल्या अवस्थेत आढळून आला. सदर व्यक्तीचा रंग काळा असून उंची ५.५ फूट, बांधा सडपातळ, अंगात राखड्या रंगाचा फुलाचा टि शर्ट व काळसर रंगाची ट्रॅपॅन्ट, ...पान ६ वर

## पान १ वरून...

### सात मुलांच्या आईचा तोल...

तुटले असून गेले सहा महिने आपण एकमेकांना भेटलो नसल्याचं तीने सांगितलं. त्यानंतर पोलिसांनी आपला मोर्चा पुन्हा प्रमोद राहात असलेल्या परिसरात वळवला. प्रमोदच्या घराच्या आसपासच्या लोकांकडे चौकशी केली पण त्या रात्री कोणी अज्ञात व्यक्ती परिसरात पाहिला नसल्याचं शेजारच्यांनी सांगितलं. पण शेजारच्या काही लोकांनी दिलेल्या एका मुद्द्यावर पोलिसांना वेगळाच संशय आला. घटनेच्या दिवशी प्रमोद झिने हा रात्री दारू पिऊन घरी आला होता. त्यानंतर तो घराच्या अंगणातच बाज टाकून झोपला. त्यांच्या घरात एक पाळिव श्वान होता. पण ज्या रात्री प्रमोदचा खून झाला त्या रात्री त्यांच्या श्वान भूंकला नाही, अज्ञात व्यक्ती घराजवळ आला असता तर तो श्वान भूंकला असता, अशी माहिती शेजारच्यांनी दिली. त्यामुळे प्रमोदची हत्या त्याच्या घरातल्यांनीच केली असल्याचं स्पष्ट झालं. घरात लहान मुलं आणि पत्नी होती. लहान मुलं बापाची हत्या करु शकत नाही, त्यामुळे पोलिसांनी प्रमोदची पत्नी आशा झिने हिला ताब्यात घेतलं. सुरुवातीला तीने आपण हा खून केला नसल्याचं सांगितलं. पण पोलिसी खाक्या दाखवताच तीने प्रमोदच्या हत्येची कबूली दिली. प्रमोद झिने आणि आशाचं २० वर्षापूर्वी लग्न झालं. त्यांना सात मुलं आहेत. यात सहा मुली तर एक मुलगा आहे. आशा हिचं रेवगाव इथं राहाणाऱ्या रुपेश शिंदे नावाच्या व्यक्तीशी सूत जुळलं होतं. रुपेश शिंदेला दोन मुली आणि एक मुलगा अशी तीन मुलं आहेत. रुपेश हा मोलमजुरीची कामं करतो. आशा आणि रुपेशच्या प्रेमात प्रमोद अडसर ठरत होता. त्यामुळे त्या दोघांनी मिळून प्रमोदचा काटा काढण्याचा कट रचला. घटनेच्या दिवसी सकाळी रुपेशने धारदार तलवार आणून आशा दिली होती. तीने ती घरात लपवून ठेवली. रात्री प्रमोदा कामावरून येतानाच पिऊन घरी आला. गरम होत असल्याने त्याने घराच्या अंगणात बाज टाकली आणि तिथेच झोपी गेला. दारुच्या नशेत असल्याने आशाचं काम आणखी सोप झालं होतं. प्रमोद झोपेत असतानाच आशाने तलवारीने त्याच्यावर वार केले. यात प्रमोदचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर आशाने त्याच्या हातातलं कडं, गळ्यातील चेन रुपेशला नेऊन दिली आणि पुन्हा घरी येऊन झोपली. सकाळी प्रमोदचा मृतदेह पाहून तीने आरडा ओरडा केला आणि पोलिसांत तक्रार दिली. पण तिचं हे नाटक फार काळ टिकू शकलं नाही. प्रमोदच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी आरोपी आशा झिने आणि रुपेश शिंदेला अटक केली आहे. पण या अनैतिक संबंधात निष्पाप मुलांना मात्र नाहक शिक्षा भोगावी लागतेय. प्रमोद-आशा झिनेची सात मुलं आणि रुपेश शिंदेला अटक झाल्याने त्याची तीन अशी दहा मुलं आता उघड्यावर आली आहेत.

### पैशांसाठी शिष्याकडून भयंकर पाप...

तपासात पुढे आले. त्याच्यावर कोयत्याने वार करून त्याच्या मृतदेहाचे त्याच कोयत्याने ९ तुकडे केले आणि ते तुकडे रायबाग जवळील कटकभावी येथील कुपनलिकेत टाकले असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. देशात तसेच पश्चिम महाराष्ट्र कर्नाटकात जैन समुदाय मोठया प्रमाणात असल्याने लहान मोठ्या शहरात गावात त्याची बस्ती आहे, तसेच आश्रम ही आहेत. कर्नाटकातील चिक्कोडी तालुक्यातील हिरेकुडी येथील डोंगरावर सुमारे १५ वर्षापूर्वी नंदी पर्वतावर जैन समजाचे आचार्य १०८ कामकुमार नंदी महाराज यांनी टप्पाटप्याने आपल्या अनुयांच्या सहकार्याने आश्रमाची स्थापना केली. कालांतराने या आश्रमाची व्यापती वाढून येथे जैन धर्मातील श्रावक श्राविका भक्ती भावाने येथे येवून पुजा अर्चा करू लागले. या पिठाची मोठया प्रमाणात प्रसिद्धी झाल्याने येथे भाविकांचा ओघ ही वाढला. १०८ कामकुमार नंदी महाराज यांचे मुळे नाव भरमाप्पा भिमाप्पा उगार हे असून ते मुळचे अथणी तालुक्यातील खवटकोप्प येथील आहेत. त्यांना सात भाऊ आणि तीन बहिणी असा त्याचा परिवार आहे. त्याच्या तीन भावांचे निधन झाले असून उर्वरीत परिवार हा खवटकोप्प येथे आहे. १९६७ साली भरमाप्पा याचा जन्म झाला. ते शिक्षणात ही हुशार असल्याने त्यांनी बीई पदवीपर्यतचे शिक्षण घेतले. त्यांनी गृहस्ताश्रमाची ओढ ही कमीच होती. त्याचे शिक्षण पुर्ण झाल्यावर त्यांनी विवाह केला नाही परिणामी त्यांना अध्यात्माची ओढ लागली. घरची परिस्थीती ही सधन असल्याने त्यांना कशाची ही कमतरता नव्हती. या अध्यात्माच्या ओढीतून त्यांनी अकलुज येथील कुंथीसागर महाराजकडून जैन धर्माची दिक्षा घेतली आणि ते अध्यात्मात कार्य करू लागले त्यांना कन्नड, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत असल्याने अनेक धार्मीक ग्रंथाची आणि भक्तीगितांची रचना केली. तेथूनच ते जैन धर्माच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी फिरू लागले. गावोगावी फिरून ते धर्म प्रसार करीत असताना त्यांनी आपले शिष्यगण ही वाढविले. ते धर्म प्रसारासाठी दिल्ली, डेहराडून, हिमालय येथे ही जावून आले. जैन धर्मियात चार्तुमासाला जास्त महत्व असल्याने ते साजरा करीत होते. चार्तुमासासाठी ते मुंबईला ही जावून आले. त्यानंतर त्यांनी सन २०१० साली चिक्कोडी जवळील हिरेकुडी येथे नंदी पर्वत नावांने आश्रम सुरू करून येथे ते आपल्या श्रावक श्राविकांना रोज आपल्या श्रवण वाणीने भक्ती रसात गुंतवून ठेवू लागले. त्याचे रसाळ श्रवण ऐकण्यासाठी महाराष्ट्र कर्नाटकातून लोक येवू लागले. परिणामी त्याचे शिष्यगण ही वाढले.

या शिष्यामध्ये रायबाग जवळील कटकभावी येथील नारायण माळी हा देखील होता. तो गेल्या काही वर्षापासून महाराजांच्या सेवेत असल्याने तो महाराजांना जास्त परिचित होता. नारायण माळी हा देखील या आश्रमातच गेल्या काही वर्षापासून राहयला होता. महाराजाच्या सानिध्यात राहून त्याने त्याचा विश्वास ही संपादन केला असल्याने तो जास्तच महाराजांना जवळचा वाटत होता. त्याला महाराजांची बारीक सारीक गोष्ट माहिती होती. महाराज ही त्याला जवळचा मानत असल्याने त्याला ते मदत ही करीत होते. नारायण माळीची अडचण महाराजांना माहित होती. गेल्या काही महिन्यापूर्वी नारायण माळी याने महाराजांना भेटून आपली एक अडचण सांगितली. त्यावेळी नाही होय म्हणत महाराजांनी त्याला एक लाख रूपयांची मदत केली. नारायण याने महाराजांच्याकडून लाख रूपये घेऊन आपली अडचण काढली. त्यानंतर मात्र तो महाराजांना ती रक्कम परत देण्याचे नाव काढत नव्हता. त्याची अडचण काढत असताना महाराजांनी त्याला आश्रमातील कुंडीतील रक्कम दिली असल्याने त्याचेकडून ती रक्कम परत मिळविणे त्यांना क्रमप्राप्त होते. म्हणून ते त्याला ती रक्कम मला वेळेत परत कर म्हणून सांगत होते. परंतु त्याच्या सांगण्याकडे नारायण माळी हा सोईस्कररित्या दुर्लक्ष करीत होता. ही गोष्ट महाराजाच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्याला बोलावून सरळ मार्गाने सांगितले. तुला दिलेली रक्कम परत कर.ते पैसे लोकांचे आहेत.लोकांना ते उपयोगी पडतील. आता तुझे काम झाले आहे. त्या पैशाचा तुला ही उपयोग झाला आहे. आता तु पैसे परत करायला हवेत असे सांगून ते त्याला ती रक्कम परत करण्यासाठी तगादा लावू लागले. त्यामुळे आश्रमात हल्ली नारायण माळी येत नव्हता. तो कटकभावी येथे आपल्या मुळ गावी राहू लागला. त्यामुळे महाराजांनी त्याला आपल्या दुसऱ्या शिष्याकडून निरोप पाठवून त्याला परत आश्रमात बोलावून घेतले. तो परत आश्रमात आल्यावर महाराजांनी परत त्याचेकडे त्या रक्कमेसाठी तगादा लावला. कामकुमार नंदी महाराज हे वरून वाणीने नम्र आणि विनयशील असले तरी व्यवहारला ते करेक्ट होते. त्यांनी गृहस्थाश्रम सोडून अध्यात्माचा मार्ग स्विकारला असल्याने त्यांना कशाचा मोह नव्हता. परंतु आश्रामाच्या व्यवहरात ते कुणाचा ही मुलाहिजा ठेवत नव्हते.

सहसा ते कधी कोणाशी आर्थिक व्यवहार करीत नव्हते. चुकूनच त्यांनी नारायण माळीशी आर्थिक व्यवहार केला होता. महाराज आपल्याकडे दिलेली रक्कम परत मागत आहेत याचा राग नारायण माळीला आला. काय केले म्हणजे महाराज आपल्याकडे ती रक्कम परत मागणार नाहीत याचा तो विचार करीत होता. तो विचार करीत असताना त्याने महाराजांचा कायमचा काटा काढण्याचा विचार केला. महाराज हे आश्रमातील त्याचे खोलीत संध्याकाळी ७ वाजले नंतर एकटेच असतात हे त्याला माहित होते.त्याने ही गोष्ट आपला मित्र हसन ढालावत याला सांगितली. त्या दोघांनी महाराजांची हत्या करून त्यांच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा प्लॅन केला. महाराजांचा काटा काढण्यासाठी नारायण माळी हा अलिकडे आश्रमात आला होता. दि.५ जुलै रोजी नेहमीप्रमाणे महाराज हे आपले नित्य कार्यक्रम आटोपून संध्याकाळी आपल्या खोलीत जप आणि ध्यान धारणा करीत असताना अचानक नारायण हा खोलीत आला. जप करणाऱ्या कामकुमार महाराजावर त्याने हल्ला केला. त्याचेबरोबर त्यावेळी हसन ढालयत ही होता. दोघांनी मिळून खोलीचा दरवाजा बंद करून त्यांनी महाराजांना मारहाण करायला सुरूवात केली. त्यानंतर नारायण याने महाराजांना खाली पाडून त्यांचा गळा दाबून धरला. त्यावेळी आश्रमात कुणी नव्हते. याच संधीच फायदा उठवत त्यांनी महाराजांचा गळा दाबून त्यांना मारून टाकले.त्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास त्या दोघांनी महाराजांचा मृतदेह एका चार चाकी गाडीत टाकून कटकभावी येथे नेले. तेथे त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्या दोघांनी कोयत्याने त्याच्या मृतदेहाचे ९ तुकडे केले. नारायण माळीचे कटकभावी येथे शेत असून त्या शेतात त्याची कुपनलिका आहे.त्या रात्री त्या दोघांनी महारांजाच्या मृतदेहाचे तुकडे एका साडीमध्ये गुंडाळून त्या कुपनलिकेतील ४०० फुट आत टाकले. त्यानंतर त्यांनी तेथून पोबारा केला. त्यानंतर दोन तीन दिवस महाराज आश्रमात दिसेनासे झाल्यावर त्याच्या श्रावक श्राविकांनी महारांजाचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्याच्या खोलीत श्रावक श्राविकांना महाराजांचा मोबाईल आणि कुपमंडल दिसले. महाराज बेपत्ता झाल्याची तक्रार त्या श्रावक श्राविकांनी चिक्कोडी पोलीसात दाखल केली.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी आश्रमातील शिष्याची विचारपूस करीत असताना महाराजांचा शिष्य नारायण माळी हा महाराज बेपता झाल्या दिवसापासून तो ही आश्रामात नसल्याची माहिती पुढे आल्यावर पोलीसांनी त्याचा शोध सुरू केला.तो रायबाग जवळील कटकभावी येथील आपल्या गावी असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यातून घेतले. त्याला चिक्कोडी पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे महाराजा विषयी चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्यातच पोलीसांना नारायण याने महाराजाकडून काही रक्कम उसणे घेतल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने पोलीसांनी त्याचेकडे चौकशी केली असता त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती आढळून आली. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून धक्कादायक माहिती देवून महाराजाची हत्या करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून कटकभावी येथील आपल्या शेतातील कुपनलिकेत टाकले असल्याची माहिती पोलीसांना दिली. यात आपला मित्र हसन ढालयत याने मदत केल्याचे पोलीसांना सांगितले. या घटनेची गांर्भिय लक्षात घेऊन जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.संजीव पाटील यांनी घटनास्थळी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. नारायण माळी हा पोलीसांना वेगवेगळी माहिती देत असल्याने पोलीस ही चक्रावून गेले होते. कटकभावी येथील कुपनलिकेत टाकलेले मृतदेहाचे तुकडे काढण्यासाठी पोलीसांनी शोध कार्य सुरू केले. त्यावेळी घटनास्थळी ५०० पोलीसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मृतदेहाचे तुकडे बाहेर काढून पोलीसांनी उतरीय तापसणीसाठी ते जिल्हा रुग्णालयात पाठवून दिले. जैन महाराजांची हत्या झाली असल्याच्या या घटनेने जिल्हयात नव्हे तर संपुर्ण कर्नाटक आणि पश्चिम महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. ठिकठिकाणी या घटनेच्या निषेधार्थ मोर्च निघाले होते. या घटनेची फिर्याद आश्रामाच्या प्रमुखांनी दिल्याने पोलीसांनी १०८ श्री कामकुमार नंदी महाराज (वय ५५) याची हत्या करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी नारायण माळी आणि हसन ढालायत याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवनागी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. नारायण माळी याचेकडून पोलीसांनी गुन्हयात वापरलेला कोयता व चार चाकी गाडी जप्त केली. ही घटना संदेनशील असल्याने आश्रमात व घटनास्थळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. या घटनेचा पुढील तपास चिक्कोडी पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. माणुस कितीही जवळचा आणि विश्वासू असला तरी त्याचेबरोबर व्यवहार करीत असताना सर्तकता बाळगावी लागते.व्यवहारात कोण कधी कसे वागेल हे काही सांगता येत नाही. हेच या घटनेवरून दिसून येते. जैन मुनीच्या हत्येने खळबळ उडाल्याने या घटनेचे पडसाद ठिकठिकाणी पाहयला मिळाले. या घटनेने महाराजाच्या श्रावक श्राविकांना धक्काच बसला. महाराजाच्या अंत्यसंस्कारला राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील लोक हजर होते.

### 'लव्ह स्टोरी'चा भयंकर शेवट ...

यांना खटकत होती. हल्ली तर ते तिला मी जेथे तुझे लग्न करून देईन तेथे तुला लग्न करून घ्यावे लागेल असे स्पष्ट सांगितले. घरात आई वडिल आपल्यां लग्नासाठी जास्त जोर दयायला लागल्यावर तिने ही आपल्या आई वडिलांना स्पष्टच सांगितले की मी लग्न करेन तर मी ज्या मुलावर प्रेम करते त्याच मुलाबरोबर करेन. तुम्ही जर आमच्या प्रेमाला विरोध केला तर आम्ही दोघे जण पळून जावून लग्न करू.तिने असे सांगितल्यावर संतो जाधव याच्या पायाखालची वाळूच सरकली होती. आपली मुलगी प्रेमात भरकटत चालली आहे. तिचा निर्णय चुकीचा आहे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी तिला बऱ्याच वेळेला समजावून सांगण्याचा प्रयत्न ही केला. परंतु ती काही त्याचे ऐकत नव्हती. या कारणातून घरात नेहमी भांडणे ही होऊ लागली होती.संतोष जाधव यांनी तर तिला अलिकडे दमच दिला होता. तु तर त्याचा नाद सोडली नाहीस तर मी तुझे कॉलेजला जाणे देखील बंद करून टाकीन.श्रेयाच्या डोक्यात प्रेमाचे इतके खुळ बसले होते की ती त्याच्यासाठी काही ही करायला तयार होती. ती त्या मुलाबरोबर पळून जायला ही तयार होती, परंतु अडचण इतकीच होती की तिचे वय अदयाप बसत नव्हते.ती सध्या १७ वर्षाची होती. त्यामुळे तिला त्याच्याबरोबर पळून जाणे ही शक्य नव्हते. इकडे तर तिच्या आई वडिलांनी तिच्या लग्नासाठी जोर लावला होता. मुलगीने पळून जावून लग्न करण्यापेक्षा आपण तिचे लवकर हात पिवळे केलेले बरे असे त्यांना वाटत होती. काही झाले तरी श्रेया लग्नाला तयार होत नव्हती ही तिच्या आई वडिलांची अडचण होती. त्यामुळे रोज सकाळ संध्याकाळ वडिल आणि मुलगी याची या कारणातून भांडणे होत होती.त्यातच मागे एकदा श्रेयाने भांडणात आई वडिलांना धमकी दिली की, तुम्ही जर माझ्यावर जबरदस्ती केली तर मी विष खावून मरेन.त्यामुळे ते ही घाबरले होते. तिने जो मुलगा पंसत केला होता. तो मुलगा तिच्या आई वडिलांना पंसत नव्हता. त्यामुळे लग्नाला श्रेया तयार होत नव्हती.तिचा त्या मुलाबरोबर लग्न करण्याचा हट्ट होता. तो हट्ट तिचे आई वडिल पुर्ण करू शकत नव्हते. आपल्या आई वडिलांचा आपल्या प्रेमाला होणारा विरोध लक्षात घेऊन श्रेयाने पळून जाण्याचा विचार केला पण वयाचे बंधन येत असल्याने तो विचार बदलला. त्यामुळे वडिल संतोष जाधव यांनी परत तिला दाखवायला सुरूवात केली. गेल्या महिन्यात तिला एक स्थळ आले. ते स्थळ ही तिच्या आई वडिलांना पंसत होते. पण नेहमी प्रमाणे श्रेयाने या ही स्थळाला नकार दिला. त्यामुळे वडिलाच्या बरोबर तिचा या कारणातून रोज भांडणे होऊ लागली.

शनिवार दि.१ जुलै २०२३ रोजी रात्री वडिल संतोष जाधव हे दारूच्या नशेत घराकडे आले.त्यावेळी त्याची बायको बाहेरच्या खोलीत बसली होती.नवरा दारू पिऊन आल्याचे तिने ओळखले. आल्या आल्या त्यांनी बायकोला श्रेया कुठे आहे हे विचारले. त्यावेळी तिने ती स्वयंपाक घरात असल्याचे सांगितल्यावर ते तडक तेथे गेले. वडिल दारू पिल्याचे तिने ही ओळखले. दारूच्या नशेत त्यांनी श्रेयाला तुला आम्ही सांगतो त्या मुलाबरोबर लग्न करावेच लागेल म्हरून भांडण काढायला सुरूवात केली ते तिला मारायला ही जात होते. त्याचवेळी श्रेयाच्या आईने त्यांना आडवत वयात आलेल्या मुलीच्या अंगावर हात टाकू नका म्हणत त्याना बाजुला ढकलले. ते श्रेयाला बडबडत उदयापासून तुझे कॉलेज बंद तू घरातून ही बाहेर पडयाचे नाही असे बाजवले. त्यावर रागाच्या भरात असणाऱ्या श्रेयाने पप्पा तुम्ही माझ्यावर लग्नासाठी जबरदस्ती करू नका नाही तर त्याचे परिणाम वाईट होतील असे सांगितले मुलगी आपल्याला धमकी देत आहे हे बघून त्याचे टाळके सटकले. दोघांची भांडण चालू होते. त्यावेळी तिच्या आईने मध्यस्थी करीत म्हटले की तुझे वय पुर्ण झाले की मग आपण लग्नाचा विचार करू. त्यावर ती गप्प बसली होती. पण संतोष याच्या डोक्यात दुसराच विचार येत होता. आपली मुलगी हाताबाहेर जात आहे हे त्यांना वाटत होते. तिने आपले तोड काळे करण्या अगोरदच आपणच हिला संपवलले बरे म्हणत त्यांनी स्वयंपाक घरातील भाजी कापतेला चाकू घेतला आणि बेसावध असणाऱ्या श्रेयाच्या अंगावर चाकूने सपासप वार केले. त्यांनी तिच्या पोटात आणि हातावर सपासप वार करून तिला जबर जखमी केले. घरात आरडा ओरडा सुरू झाला. शेजारचे लोक ही जमा झाले. तावा तावाने संतोष जाधव बायकोला आणि मुलीला शिव्या देत यांना संपविल्या शिवाय आपण गप्प राहणार नाही म्हणत होते. या संगळ्या गोंधळात घरातील स्वयंपाक घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जखमी श्रेयाला शेजारच्यांनी जवळच्या दवाखान्यात नेले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. तिच्या शरीरावर चाकूने जबर वार झाल्याने मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला त्यातच तिचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती विटा पोलीसांना देण्यात आली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घरातील स्वयंपाक खोलीत रक्त पडले होते. तर बाजुलाच रक्ताने माखलेला चाकू पडला होता. हताशपणे डोक्याला हात लावून संतोष जाधव हे बसले होते. या घटनेची माहिती मयत श्रेयाच्या आई कडून पोलीसांनी घेतली. घटनास्थळावरून पोलीसांनी संतोष जाधव यांना ताब्यात घेतले. घटनास्थळाचा पंचनामा करून श्रेयाचा मृतदेह खाजगी दवाखान्यातून शवविच्छेदनासाठी सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. या घटनेची पोलीसांनी संतोष जाधव याच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.

मयत श्रेयाच्या बहिण किरण जाधव हिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी श्रेया संतोष जाधव (वय १७) हिच्या खून प्रकरणी तिचे वडिल संतोष जाधव (वय ४७) यांच्या विरोधात विटा पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी संतोष जाधव याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास स.पो.नि. प्रशांत चव्हाण हे करीत आहेत. प्रेमात आणि युध्दात सर्व काही माफ असते असे म्हणात पण कुणीच आपली चुक मान्य करून उदार मनाने प्रेमाला स्विकारत नाहीत. काही ना काही सांगून प्रेमाला विरोध हा होत असतो नेमकी तिच गोष्ट श्रेया आणि तिच्या वडिलाबाबत झाली या विरोधातूनच वडिलांनी १७ वर्षीय मुलीचा खून केल्याची दुर्देवी घटना घडली.

### धमकीमुळे दोघांमधला वाद वाढला...

दुसऱ्या कॉलेजमध्ये पदवीचे शिक्षण घेत असल्याने हे तिघे ही गावातून कॉलेजला एकाच बसमधून येत जात असल्याने त्यातून त्याची ओळख वाढली. हल्लीचे तरूण कॉलेजचे शिक्षण घेत असताना त्यांना इतर ही नाद असतात. त्याप्रमाणे या तिघांना ही बिअर पिण्याचा नाद होता. त्यासाठी ते पार्टी करीत होते. पार्टीत एकमेकांशी वाद विवाद हा होत होता. मागील वर्षी प्रसाद आणि अरबाज याचेत वाद झाला होता. दारूची पार्टी रंगात आली असताना प्रसाद याने कशाच्या तरी कारणातून शिवीगाळ केली होती. त्यावेळी अरबाज याने त्याला मी तुला सोडणार नाही. तुला मारूनच टाकतो अशी धमकी दिली होती. त्यावेळी नशेत त्या दोघात मारामारी देखील झाली. गेल्या वर्षापासून त्या दोघांत खुन्नस वाढत चालली होती. तशी त्या तिघांच्या ही घरची परिस्थीती ही बेताची असली तरी शिक्षणाच्या नावाखाली हे तिघे ही खुशाल चेंडू सारखे पार्टया करीत फिरत होते. त्याच्या आई वडिलांचे ही त्याचेकडे लक्ष नव्हते. आपली मुले शिक्षण घेत आहेत एवढेच त्यांना माहित होते. प्रसाद आणि अरबाज याचेतील वाद घुमसत होता. अरबाजने त्याला मी तुला सोडणार नाही अशी धमकी दिल्याने निम्मा अर्धा प्रसाद गांगराला होता. अरबाजकडे मित्र जास्तच आहेत. तो त्यांना घेऊन कधी आपला काटा काढील याचा काही नेम नाही असे त्याला वाटत होते. त्याने खरे तर अरबाजची धास्तीच घेतली होती. शुक्रवार दि.१४ जुलै रोजी हुचेनहट्टी गावातील जैन कॉलेजच्या मागील बाजूस असणाऱ्या मोकळया मैदानातील एका निर्जन जागेत एका तरूणाचा धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या केल्याचे एका आजील दिसून आले. ती बिचारी सकाळी सकाळी शेण थापटण्यासाठी तेथे गेली होती. ती जेथे शेण थापटण्यासाठी जात होती. त्या रस्त्याच्या पायवाटेवरील एका आडबाजुला एक तरूण रक्ताच्या थारोळात पडल्याचे तिला दिसल्यावर तिने ही घटना गावातील लोकांना सांगितली. जैन कॉलेजच्या मागील बाजूस एका तरूणाचा खून झाल्याची माहिती मिळताच गावातील लोकांनी एकच गर्दी घटनास्थळी केली. तो तरूण गर्दीतील लोकांना ओळखीचा होता. हुचेनहट्टी शेजारील पिरनवाडी येथील तो तरूण असल्याचे त्यांनी ओळखले. या घटनेची माहिती कुणी तरी वडगाव पोलीसांना दिल्यावर पो.उप.निरी.लकाप्पा जोडट्टी यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी धाव घेऊन या घटनेची माहिती घेतली.मयत तरूणाची ओळख पटल्यावर पोलीसांनी या घटनेची माहिती पिरनवाडी येथील त्याच्या आई वडिलांना दिली. ही माहिती समजातच ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अरबाजाच्या आई आणि बहिणीने मोठ मोठयाने अक्रोश करीत होते. मयत अरबाजच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या. तो रक्ताच्या थारोळ्यात पालथा पडला होता.बाजूलाच दारूच्या बाटल्या, ग्लास, स्नॅक्स पडले होते. त्यावरून पोलीसांनी अंदाज बांधला की, हा खून कुणी तरी दारूच्या पार्टीत केला आहे.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगावी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. अरबाज याचा खून कुणी आणि कोणत्या कारणासाठी केला याचा तपास पोलीस करीत असताना मयत अरबाज याचा मोबाईल फोन त्यांनी चेक केला. त्याच्या मोबाईलवर गुरूवार दि.१३ जुलै रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास हुचेनहट्टी येथील प्रशांत वड्डुर याचा फोन आल्याचे दिसून आले. प्रशांत याचा शोध घ्यायला पोलीसांनी सुरूवात केली. तो गावात नव्हता. त्याचा मोबाईल ही स्विच ऑफ लागत होता. शुक्रवार दुपार नंतर त्याचा मोबाईल चालू असल्याचे पोलीसांच्या लक्षात आल्यावर त्याचे लोकेशन पोलीसांनी काढले असता ते बेळगावी शहरात दाखवत होते. वडगाव परिसरात त्याचे मोबाईल लोकेशन दाखवत असल्याने तो लपून बसलेल्या ठिकाणी पोलीसांनी सापाळा रचून त्याला तेथून ताब्यात घेतले. त्याला वडगाव पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने प्रसाद कळवेकर याचे नाव पोलीसांना सांगून तो कुठे लपून बसला आहे याची माहिती त्यांना दिली.त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी प्रसाद याला देखील तो लपून बसलेल्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. त्या दोघांनी पोलीसांना अरबाज याच्या खूनाविषयी जी माहिती दिली ती अशी. प्रसाद कळवेकर आणि अरबाज याची गेल्यावर्षी भांडणे झाली होती. त्या भांडणात अरबाज याने प्रसाद याला तुला मी सोडणार नाही अशी धमकी दिली होती. तो आपल्या संपविण्या आधी आपणच त्याला संपवले तर बरे होईल असे प्रसाद याला वाटले. तो त्याचा कायमाचा काटा काढण्याच्या विचारात होता. तो त्याचेवर डुख धरूनच असल्याने त्याला कसे संपवायचे याचा तो विचार करीत असताना प्रशांत वड्डुर याच्या मध्यस्थीने त्याने अरबाज याला दारू पिण्यासाठी बोलावून घेण्याचे ठरविले.त्यानुसार त्याने गुरूवार दि.१३ जुलै रोजी सायकांळी ७.३०च्या दरम्यान वड्डुर याला अरबाज याला फोन करून बोलावून घेण्यास सांगितले.हुचेनहट्टी येथील जैन कॉलेजच्या मागील बाजूस त्यांनी पार्टी करण्याचा बेत केला. प्रशांतने बोलवले म्हटल्यावर अरबाज याने घरात कोणाला काही न सांगता बाहेर पडला. कॉलेजच्या मोकळ्या मैदानातील मागील बाजूस तसा अंधार असल्याने तेथे ते तिघे ही रात्री ९च्या सुमारास दारूची पार्टी करीत बसले. दारूचा एक एक पेग ते तिघे ही आपल्या घशाखाली रिचवत असताना त्यांना नशा होत होती. तिघांना ही नशा चढली होती.त्यावेळी रागाच्या भरात प्रसाद याने मागील भांडणाचा विषय उकरून काढत तू मला सोडणार नाहीस असे म्हणाला होतास ना असे म्हणत आता मार बघु म्हणत अरबाज याला उकसावले. दारूच्या नशेत असणाऱ्यां अरबाज याने प्रसाद याच्या शर्टाची कॉलर पकडली. त्याला शिव्या देत तुला मारूनच टाकतो म्हणत त्याच्या अंगावर धावून गेला.प्रसाद हा सावधच होता. त्याने त्याला ठोसा लावून खाली पाडले. त्यासरशी प्रशांत याने त्याला मारहाण करीत लाथा बुक्का मारल्या. ते दोघे त्याला एकटे बघून मारहाण करीत असताना तो ओरडत होता. पण रात्रीच्यावेळी तेथे कुणी नव्हते. त्या तिघांत हातापायी चालली असताना प्रसाद याने आपल्या हातातील लोंखडी कडयाने त्याचे डोक्यात जोरात हाणले. त्यासरशी अरबाज हा बेशुध्द पडला. हे बघून परत त्याने आपल्याकडील चाकू काढून अरबाजच्या गळ्यावर, मानेवर आणि पोटात सपासप वार केले. त्यासरशी तो रक्ताच्या थारोळयात निपचिप पडला.जागीच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याला तेथेच टाकून त्या दोघांनी तथून पळ काढला. ते दोघे रात्रीच बेळगावी येथील आपल्या नातेवाईकाकडे गेले.त्या दोघांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. या घटनेची लेखी फिर्यात मयत अरबाजची आजीने दिलेल्या फिर्यादीवरून वडगाव पोलीसांनी अरबाज रफीक मुल्ला (वय २१) याच्या खून प्रकरणी प्रशांत वड्डुर (वय १९) आणि प्रवास कळवेकर (वय २१) रा.दोघे ही हुचेनहट्टी याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना बेळगावी येथील कोर्टात उभे केले असता मा.कोटाने त्याची रवानगी हिडंलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास वडगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी पो.निरी. विजयकुमार सिन्नुर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. लक्काप्पा जोडद्दी हे करीत आहेत. मागील भांडणाची खुन्नस ठेवून काहीजण वागत राहत असल्याने त्याच्या डोक्यात नेहमी बदल्याची भावाना असते आणि त्या भावनेतूनच ते टोकाचा निर्णय घेतात आणि एखाद्या खूनाच्या घटनेत अपसूक अडकतात त्यांना त्याच्या परिणामाची चिंता नसल्याने त्याच्या हातून ती घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

### भावाला त्याचे नातेही नाही दिसले...

आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात मयताच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून नंदू गायकवाड विरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगर हादरलं आहे.

# हंचनाळ येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिकेने केली तब्बल १२ झाडांची कत्तल!

## ग्रामस्थ संतप्त तर गटशिक्षणाधिकारी बोईनवाड एक्शन मोडवर



**देवणी/शकील मनियार**

देवणी तालुक्यातील हंचनाळ येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील सहशिक्षीका सुनीता धनाजीराव मगर यांनी शाळेच्या आवारातील दोन वर्षीय १२ झाडांची कत्तल केल्या प्रकरणी त्यांना निलंबित करा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने मंगळवार दि.११ जुलै रोजी गटशिक्षणाधिकारी देवणी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हंचनाळ ग्रामस्थांच्या निवेदनाची तात्काळ दखल घेत गटशिक्षणाधिकारी देवणी व्यंकटराव बोईनवाड यांनी हंचनाळ येथील जिल्हा परिषद शाळेला तात्काळ भेट देऊन घटनेची सर्व हकीकत जाणून घेतली. सदरील शिक्षीकेने १० जुलै रोजी शाळेच्या आवारातील २ वर्षे जीवंत असलेली सागवान ४, अशोका २, करंजीचे ३, कडूलिंब ३, अशी एकुण १२ झाडांची विनाकारण कत्तल केली आहे. व तसेच अनेक दिवसांपासून ग्रामस्थांना अर्वाच्य भाषेत बोलणे, हंचनाळ येथील जिल्हा परिषदेची शाळा उठवायची आहे. म्हणून बोलणे, व नागरिकांना व महिलांना पोलीस केसेस करण्याची धमकी देणे असे एक ना अनेक कृत्य करीत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. शिक्षिका सुनीता मगर हीचे मानसिक संतुलन ढासळल्याने सदरील कृत्य केल्याचे माहितीतून समोर आले आहे. त्यांच्या अशा वागण्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून याचे गांभीर्य लक्षात घेत व ग्रामस्थांच्या तक्रारीवरुन गटशिक्षणाधिकारी बोईनवाड यांनी शिक्षणाधिकारी लातूर यांच्याकडे सदरील शिक्षीका सुनीता मगर यांच्या विरोधात कार्यवाहीस्तव पत्र सादर केले आहे. याप्रकरणी शिक्षणाधिकारी लातूर यांनी काय निर्णय घेतात याकडे सर्व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील आषाढी वारी बंदोबस्त संपताच अवैध धंद्यावर विषेश मोहीमेच्या माध्यमातून दणका



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलास श्रीक्षेत्र पंढरपूर येथील वारीचे नियोजन व बंदोबस्त असे मोठ्या प्रमाणात कामकाज करावे लागते. त्यात आषाढी वारीमध्ये श्री ज्ञानेश्वर माउली व श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळास देखील चोख बंदोबस्त पुरवावा लागतो. यावर्षीचा आषाढी वारी बंदोबस्त संपताच शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. हिंमत जाधव यांनी अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी ५ जुलै २०२३ ते १० जुलै २०२३ या कालावधीत विषेश मोहीम हाती घेतली होती. त्यामध्ये अवैध दारू, जुगार, अग्नीशस्त्र व वाळू यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते. सदर विशेष मोहीम अंतर्गत अवैध दारूच्या एकूण १३३ केसेस करण्यात आलेल्या असून १४,०१९ लिटर हा.भ.दारू व रसायन जप्त करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे देशी विदेशी दारूच्या १७५५ क्वॉर्टर असा दारूबंदीच्या गुन्हयात ७,३४,९६५/- रूपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये २७ केसेस करून १,१७,१७०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याचप्रमाणे वाळू चोरीच्या ९ केसेसमध्ये २७,०७,५२०/- रूपयांची वाळूसह वाहने जप्त केली आहेत. त्याचप्रमाणे वेळापूर पोलीस ठाणेच्या हद्दीत गावठी बनावटीचे विनापरवाना पिस्टल जप्त करण्यात येवून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आषाढी वारी नंतर पुन्हा ऑपरेशन परीवर्तन '' हा उपक्रम नव्याने हाती घेण्यात आला असून यामध्ये अधिक अधिक केसेस करून उर्वरीत लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

# धोकादायक इमारतीचा सज्जा कोसळून पादचारी महिला ठार



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरा नजीकच्या खोणी ग्रामपंचायतीतील खाडीपार येथे एका धोकादायक इमारतीचा सज्जाच्या काही भाग कोसळून या दुर्घटनेत त्या ठिकाणाहून जाणारी पादचारी महिला ठार झाले आहे.शहनाज जहीर अन्सारी वय ५५ असे या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. भिवंडी तालुक्यातील खोणि ग्रामपंचायत हद्दीतील खाडीपार परिसरात गौसिया मस्जिद जवळ अब्दुला फक्की यांच्या मालकीची जीर्ण झालेली इमारत असून ग्रामपंचायत प्रशासनाने इमारत धोकादायक ठरविल्याने रिकामी केली होती. गुरुवारी पावसाचा जोर वाढल्याने या इमारतीच्या गच्चीचा सज्जा कोसळला. त्याच सुमारास नजीकच्या डोंगरकर मस्जिद ट्रस्ट च्या चाळीत राहणारी महिला शहनाज जहीर अन्सारी ही या इमारती खालून जात असताना तिच्यावर हा ढिगारा कोसळल्याने महिलेच्या डोक्यास जबर मार लागून त्यामध्ये महिला जागेवरच गतप्राण झाली. या घटनेची माहिती मिळताच निजामपूरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार व ग्रामपंचायत कर्मचारी घटनास्थळी दाखल होत त्यांनी महिलेला ढीगाऱ्या खालून काढले व तिचा मृतदेह शासकीय रुणालयात शवविच्छेदना साठी रवाना केला व घटनेची नोंद आकस्मित मृत्यू म्हणून केली आहे.

# केएसटी नशिराबाद उर्दू शाळेतील मुलांचे दाखले त्वरित द्या अन्यथा तीव्र आंदोलन करू; पालकांचा घेराव करून मागणी



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव शहराला लागून असलेल्या नशिराबाद येथील केएसटी उर्दू हायस्कूल मधील १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक नसल्याने २ जून पासून शाळा सोडल्याचा दाखला मिळत नव्हता. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणापासून शिक्षण संस्थेच्या हलगर्जीपणामुळे वंचित राहावे लागत असल्याने जळगाव जिल्हा मुस्लिम मन्यार बीरादरीचे अध्यक्ष फारुख शेख यांच्या नेतृत्वात पालकांचे शिष्टमंडळाने जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन घेराव घातला असता उपशिक्षणाधिकारी रागिनी पाटील यांनी त्वरित आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधून पालकांना १० जूनच्या संध्याकाळपर्यंत दाखले न मिळाल्यास मुलांच्या भरून न निघणाऱ्या नुकसानास शिक्षण संस्था तसेच जिल्हा परिषद येथील शैक्षणिक विभागाचे अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार राहतील व ११ जून पासून आम्ही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू अशी तक्रार केली. शिक्षण विस्तार अधिकारी यांची प्रशासक म्हणून तडकाफडकी नियुक्ती. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने त्वरित जळगाव पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी शेख खलील यांची केएसटी उर्दू हायस्कूल नशिराबाद येथे पुढील आदेश पावेतो त्यांना शाळेतील प्रशासकीय कार्य करण्याचे अधिकार दिले तसेच शाळा प्रवेश व इतर प्रशासकीय हक्क सुद्धा त्यांना देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे के एस टी उर्दू हायस्कूलच्या प्रशासक पदी शिक्षण विस्तार अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यावेळी फारुक शेख अध्यक्ष जळगाव जिल्हा मन्यार बिरादरी, सय्यद वासिफ अली निसार अली, मोहम्मद रइस सय्यद महबूब, शेख मुजम्मिल हारून, शेख मुजाहिद रज्जाक, फझल अब्दुल रज्जाक, सादिक शेख सुपडू आदींची उपस्थिती होती.

# देवणी तालुका महावितरणचे उपविभागीय कार्यालय उदगीर येथे ठेवा; देवणी तालुका संघर्ष समितीची कार्यकारी अभियंत्याकडे मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुका महावितरण विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरुवातीपासून उदगीर येथेच आहे. आता नव्याने महावितरणाचे उपविभागीय कार्यालय निलंगा येथे हलविण्याच्या सुरू असलेल्या हालचाली थांबवा व देवणी तालुका महावितरणाचे उपविभागीय कार्यालय उदगीर येथेच कायम ठेवा अशी मागणी देवणी तालुका संघर्ष समितीच्या वतीने सोमवार दि.१० जुलै रोजी कार्यकारी अभियंता उदगीर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे देवणी तालुक्यापासून जवळ असलेल्या उदगीर तालुक्यातील महावितरणाचे उपविभागीय कार्यालय लांब व न परवडणारे निलंगा तालुक्यात हलवू नये. अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर देवणी तालुका संघर्ष समितीचे अजित बेळकुणे, शरण लुल्ले, यशवंत कांबळे, अनिल रोट्टे, अनिल कांबळे, अंकुश माने, औदुंबर पांचाळ, संदीपान पेटे, ज्ञानेश्वर भोसले, पप्पू सुर्यवंशी, माधव भोसले, उमाकांत बर्गे, अंकुश बागवाले, विलास घटे, बालाजी वळसांगवीकर, गोविंद बुर्ले, जावेद तांबोळी, खाजासाब शेख, रशीदमीयाँ मल्लेवाले यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तेनझींग नॉर्गे राष्ट्रीय पुरस्कारासाठी नामांकने

**पालघर/प्रतिनिधी**

खेल मंत्रालय, केंद्र शासनाद्वारे दरवर्षी साहसी पुरस्कारांतर्गत तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी दि. १४ जुलै, २०२३ पर्यत नामांकने मागविण्यात आलेली आहेत. सदर पुरस्काराची केंद्र शासनाद्वारा प्राप्त सर्वकष माहिती सोबत जोडली आहे. तेनझिंग नॉर्गे पुरस्कारासाठी नामांकने सादर करण्यासाठी https://awards.gov.in या पोर्टलवर भेट देऊन, ऑनलाईन अर्ज सादर करावा. या पुरस्कारासाठी नामांकन सादर करणाऱ्या खेळाडूंची कामगिरी मागील तीन वर्षामधील असणे आवश्यक आहे. पुरस्कारासाठी आवश्यक असणारी कामगिरी म्हणजेच साहसी उपक्रम जमीन, हवा किंवा पाणी याठिकाणी केलेली असणे आवश्यक आहे. पुरस्कारासाठी आवश्यक असणारी कामगिरी म्हणजेच साहसी उपक्रम अत्यंत उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व साहसी उपक्रम करणाऱ्या खेळाडू, नागरिकांना केंद्र शासनाच्या वरील पोर्टलवर भेट देऊन तेनझिंग नॉर्गे पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन अर्जासोबत आवश्यक असणारे क्रीडा विभागाचे शिफारस पत्र प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदारांनी त्यांचा अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह क्रीडा विभागाच्या desk1o.dsys-mhgov.in या ई-मेल आय.डी. वर किंवा संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात दि. १२ जुलै, २०२३ पर्यत सादर करावा, प्राप्त अर्जाची छाननी करुन, पात्र उमेदवारांना शिफारसपत्र प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

# छत्रपती शिवाजी चौकातील पोलिस चौकीचे लोकार्पण



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील अत्यंत वर्दळीच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी लोकसहभागातून निजामपूरा पोलिस ठाणे अंतर्गत बनविण्यात आलेल्या पोलिस चौकीचे लोकार्पण भिवंडी पोलिस परिमंडळाचे पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या शुभहस्ते सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख, किशोर खैरनार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार, श्रीदेवी ज्वेलर्सचे रमेश जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. छत्रपती शिवाजी महाराज चौक हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी या भागात शहरातील मुख्य बाजारपेठ रस्ता व शाळा कनिष्ठ महाविद्यालया असून ग्रामीण भागातील जनता बाजारहाट, नोकरी व्यवसाया निमित्त या ठिकाणी येत असल्याने या भागात नेहमीच वर्दळ असते. येथील पूर्वपार असलेली लाकडी पोलिस चौकी रस्ता रुंदीकरणा मुळे व त्या भागात बनविलेल्या विकासकामां मुळे बाधित झाली होती. त्यानंतर निजामपूरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांनी पुढाकार घेवून श्री देवी ज्वेलर्सच्या सहकार्याने ही सुसज्य पोलिस चौकी उभारण्यात आली आहे.

विशेष म्हणजे निजमपुरा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाची सूत्रे नरेश पवार यांनी स्वीकारल्या पासून अवघ्या एक वर्षात दोन वापरात नसलेल्या पोलिस चौक्यांचे नूतनीकरण करून त्यांचे लोकार्पण केल्याने त्यांचे वरिष्ठ पोलिस अधिकारी व नागरिकांनी अभिनंदन केले आहे. या प्रसंगी पोलिस अधिकारी स्थानिक प्रतिष्ठित मान्यवर मोठे संख्येने उपस्थित होते.

# मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ आणि जत येथे जुगार अड्ड्यावर छापा; मुख्य बुकीचालकासह ६१ एजंटाविरुध्द गुन्हे दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

मल्लेवाडी येथील बुकीचालक सिध्देश्वर ज्ञानेश्वर सलगर याच्या शेतातील एका खोलीत त्याच्या साथीदारासह मोबाईलवर एजंटांकडून अंदाजे आकडयावर कल्याण, मुंबई नावाचा मटका जुगारावर पैशाची पैज लावून स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी खेळत असलेल्या ठिकाणावर प्रशिक्षणार्थी पोलिस अधिक्षक नयोमी साटम यांनी पोलिसांच्या मदतीने छापा टाकून संगणकासह जुगार साहित्य जप्त करून मंगळवेढा, जत, पंढरपूर, मोहोळ भागातील ६१ एजंटाविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान, मंगळवेढयाच्या पोलिस दलात एवढी मोठी कारवाई प्रथमच झाल्याने अवैध धंदे करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

या घटनेची हकिकत अशी, १४ जुलै रोजी सायंकाळी ६.५० वाजण्याच्या सुमारास मल्लेवाडी येथे मटका बुकीचालक सिध्देश्वर सलगर याच्या शेतातील एका खोलीत कल्याण, मुंबई नावाचा मटका जुगार अड्डा मंगळवेढा, जत, पंढरपूर, मोहोळ तालुक्यातील एजंटाला हाताशी धरून चालत असल्याची माहिती पोलिस अधिकारी नयोमी साटम यांना मिळताच त्यांनी पोलिसांच्या मदतीने तेथे छापा टाकला. यावेळी त्यांना तेथे मोबाईल, प्रिंटर, संगणक, पेन, कागद व इतर जुगाराचे साहित्य मिळून आले. अधिक चौकशी केली असता बुकीचालक हे मोबाईलवर आपले एजंटाकडून येणारे अंदाजे अंक आकडयावर मुंबई मटका नावाच्या जुगारावर पैशाची पैज लावून घेत असल्याची माहिती स्पष्ट झाली. यावेळी बुकीचालक सलगर याच्या मदतीला सुभाष घोगरे, महादेव ढेकळे, बिभीषण सलगर, तानाजी मेटकरी, संभाजी ढेकळे, सुरेश हजारे असे घटनास्थळी मिळून आले. त्यांची झडती घेतली असता १५ हजार रुपये इतकी रोख रक्कम मिळून आली. तसेच काही मोटर सायकलीही जप्त करण्यात आल्या आहेत. मटका कोण चालवतो याबाबत चौकशी केली असता सिध्देश्वर सलगर हा मुख्य बुकीचालक असल्याचे सांगण्यात येवून नेमलेले एजंट तथा आरोपी पुढीलप्रमाणे-दादा जावीर लोणार,




उमेश काटे, हुलजंती, सय्यद संख जत, माला शेख जत, तम्मा जाडरबोबलाद, ज्ञानेश्वर सुरवसे मंगळवेढा, दिलीप कोष्टी मंगळवेढा, दादा गोडसे, सलगर, निंबाणी, अनिल मदने मंगळवेढा, एस.टी.न्यूव संख, भाऊसाहेब गरंडे नंदेश्वर, आनंदा घुले मरवडे, तानाजी साळुंखे बोराळे, जावेद बोराळे, एम एस संख, धनाजी भोसले भोसे, एन.बी.न्यूव संख, मय्या खांडेकर निंबोणी, अनिल बनसोडे रड्डे, शुभम ताटे जाडरबोबलाद, बाळू साबळे बोराळे, संभाजी मस्के खडकी, डिगू जाडरबोबलाद, मुनाफ करजगी, आर के. जाधव मारापूर, मणेरी सलगर बु, अहमद न्यू, मंगळवेढा, बाबासाहेब मस्के ढवळस, बाळू सावंत मंगळवेढा, इसाक शेख करजगी, राजू खिलारे भिवरगी, रामचंद्र काळे खोमनाळ, नाना जाधव हुलजंती, शिवा कदम माडग्याळ, राम कदम अनगर, महेश चौगुले हुन्नूर, अस्लम चौधरी हुन्नूर, दत्ता काशिद मंगळवेढा, आण्णा भोसले पंढरपूर, दादा चव्हाण पंढरपूर, पप्पू गवळी मंगळवेढा, रियाज मणेरी सलगर बु.श्रीशैल्य कोळी अंकलगी, महेंद्र जाधव, मंगळवेढा, नितीन नवत्रे रड्डे, तिपण्णा कोळी अंकलगी, संगप्पा खिलारे बोबलाद, विष्णू चोपडे शिरनांदगी, शंकर चव्हाण आंधळगांव, अशपाक शेख करजगी, प्रकाश काटे जाडदबोबलाद, इराप्पा चव्हाण अंकलगी, बसू बिराजदार संख, सुनिल कानडे तळसंगी, अशोक पवार भोसे, बाळू गोवे मंगळवेढा, किरण नकाते बोराळे, संदिप पडवळे मंगळवेढा, संजय कोळी जाडरबोबलाद, इराप्पा मेटकरी अंकलगी, महेश बिराजदार संख, महादेव कानडे तळसंगी, अशोक पवार भोसे, अजीज भैय्या अंकलगी आदी आरोपी एजंट आपल्या गावामधून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून अंदाजे आकडयावर पैशाची पैज लावून त्याच्या चिठ्ठया तयार करून त्यांचे फोटो मोबाईल व्हॅटसअॅपवर बुकीचालकाकडे टॅबवरील व्हॅटसअॅपवर पाठवित असल्याचे पोलिस हवालदार सुनिल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, गेल्या अनेक वर्षापासून बुकीचालक मटका जुगार चालवित असल्याची माहिती या कारवाईवरून उघड झाली आहे.तत्कालीन पोलिस अधिक्षक विरेश प्रभू यांनी जिल्हयातील मटक्यावर छापे टाकून मटका हद्दपार केला होता.तदनंतर पहिल्यांदाच मंगळवेढा पोलिसांच्या इतिहासात ही कारवाई महिला पोलिस अधिकाऱ्यांनी केल्याने गोरगरीब कुटुंबियांमधून समाधान व्यक्त होत आहे. मटक्यामुळे अनेक गोरगरीबांचे संसार रस्त्यावर आले आहेत. यापुर्वीही येथे अनेक अधिकारी येवून गेले मात्र एवढी धाडसी कारवाई अदयाप कोणीच केली नाही. परिणामी त्या महिला पोलिस अधिकाऱ्यांचे कारवाईबाबत सर्व स्तरामधून कौतुक होत आहे.

# तीन तिघाडा काम बिघाडा!

महाराष्ट्रात पुन्हा एकदा तीन पक्षांची सत्ता आली आहे. यापूर्वी शिवसेना राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशा तीन पक्षांच्या महाविकास आघाडीची सत्ता होती. परंतु भाजपाने अगोदर शिवसेनेत फूट पाडली आणि त्यानंतर वर्षभराने राष्ट्रवादीत फूट पाडून तीन पक्षांचे सरकार स्थापन केले. परंतु आपल्याकडे एक म्हण आहे की तीन तिघाडा काम बिघाडा त्याचाच प्रत्यय महाराष्ट्राच्या राजकारणात यायला लागलाय. म्हणजे मागच्या वेळेला तीन पक्षाचे सरकार होते आणि आताही तीन पक्षांचे सरकार आहे. पण आजवरचा इतिहास पाहता आघाडीची सरकारे फार काळ टिकत नाही. सध्या महाराष्ट्रात शिवसेने मधले फूटीर, राष्ट्रवादी मधले फूटीर, भाजपा यांचे महायुतीचे जे सरकार सत्तेवर आलेले आहे, त्याला फारसे भविष्य नाही. कारण पुढील वर्ष भरात विधानसभेच्या निवडणुका आहेत आणि या निवडणुकांमध्ये या तिन्ही पक्षांना काहीही भवितव्य नाही. शिवसेना-राष्ट्रवादी फोडल्यामुळे भाजपावर महाराष्ट्रातल्या जनतेचा प्रचंड राग आहे, तर दुसरीकडे शिवसेनेतले फुटीर आणि राष्ट्रवादीतले फुटीर यांनाही महाराष्ट्रातील जनता धडा शिकवणार आहे. अशा परिस्थितीत महायुतीच्या सरकारमधील तीन पक्षांना सात-आठ महिन्यासाठी का होईना जी सत्ता मिळाली आहे. त्या सत्तेचा उपयोग करून मिळेल इतका पैसा कमवायचा ही भूमिका सध्या सत्तेतल्या पक्षाची आहे. त्यामुळे अशा लोकांच्या हातून जनतेचे भले होईल यावर कुणाचाही विश्वास नाही. पण अशा तऱ्हेने दुसऱ्यांचे पक्ष फोडून सत्ता स्थापन करणे लोकशाहीच्या दृष्टीने खूप घातक आहे. त्यामुळे फुटीर राष्ट्रवादीतले असो की शिवसेनेतले लोकांनी निवडणुकीत त्यांना धडा शिकवायला हवा. कारण प्रत्येक वेळेला जर असं व्हायला लागलं तर या देशातील लोकशाही कशी टिकेल असे प्रकार म्हणजे मतदारांचा सरळ सरळ विश्वासघात आहे. यामुळे आपला विश्वासघात करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना धडा शिकवणे हेच आता या देशातील मतदारांचे आद्यकर्तव्य आहे. उद्या समजा विधानसभेच्या निवडणुकीत एखाद्या पक्षाला पूर्ण बहुमत मिळालं आणि त्यांचे सरकार सत्तेत आलं तर ते सरकार पाडण्यासाठी पैशाचे किंवा मंत्रीपदाचे आमिष दाखवून आमदार फोडले जातील, त्यानंतर वर्ष सहा महिन्यांनी दुसऱ्या पक्षाचा सरकार येईल. पण हे असं किती दिवस चालणार. पुन्हा पुन्हा निवडणुका पुन्हा पुन्हा तेच लोक पुन्हा पुन्हा तेच गद्दार आणि पुन्हा पुन्हा त्यांना निवडून द्यायचं. यावर आता मतदाराने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. राहता राहिला सवाल सध्याच्या महायुतीच्या सरकारचा तर हे सरकार फार काळ टिकेल असं वाटत नाही. कारण या सरकारचा पायाच मुळात चुकीच्या आणि विश्वासघातावर आधारलेला आहे. कोणत्याही सरकारला पक्षांतराच्या विरोधात जर कठोर भूमिका घ्यायची असेल तर सर्वात प्रथम पक्षांतर विरोधी कायदा अधिक कठोर करायला हवा. पक्षांतर विरोधी कायद्यात मतदारांच्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान मिळायला हवे. कारण निवडणुकीत मतदार हा महत्त्वाचा घटक आहे. जर त्याचा विश्वासघात करून कोणी पक्षांतर करीत असेल तर त्या पक्षांतराला टू थर्ड च्या मेजॉरिटीचे संरक्षण असता नये, तर पक्षांतर करणाऱ्याचे तात्काळ सदस्यत्व रद्द व्हायला हवे. इतकेच नव्हे तर त्याला पुढील बारा वर्षापर्यंत निवडणूक लढवण्यास किंवा मतदान करण्यासही मज्जाव करायला हवा. तरच आयाराम गयाराम यांचे पक्षांतर थांबेल आणि या देशातील कोणत्याही पक्षाचे सरकार असो ते स्थिर राहील. कारण पैसा आणि सत्तेच्या बदल्यात पक्षांतर करण्याची कोणाची हिम्मतच होणार नाही. आज पक्षांतर करून सत्तेत बसलेले जे शिवसेनेतले फुटीर आहेत त्यांना जनतेचा एक प्रश्न आहे की महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये असताना तुम्ही सांगत होता की राष्ट्रवादी बरोबर युती केल्यामुळे आम्ही शिवसेना सोडली. तसेच आघाडी सरकारमध्ये अर्थमंत्री म्हणून निधी वाटपात अजित पवार पक्षपात करीत असत याचा बहुसंख्य आमदारांना राग होता. म्हणून त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. पण हे जर खरं असेल तर मग आता ते अजित दादांच्या मांडीला मांडी लावून कसे काय बसले. अजित दादांमध्ये असा कोणता मोठा बदल झाला की त्यामुळे या लोकांनी अजित दादा बरोबर जुळवून घेतले. याचे एकच उत्तर आहे ते जेव्हा पक्ष सोडताना कारण सांगत होते ते खोटे होते. त्यांना फक्त आणि फक्त पैसा आणि सत्ता पाहिजे होती. म्हणून ते शिवसेना सोडून भाजपासोबत सत्तेत गेले. पण अजित पवार यांनी जेव्हा राष्ट्रवादी फोडून भाजपासोबत संधान बांधले तेव्हा मात्र शिवसेनेतले फुटीर तोंडावर आपटले. आता मतदारांना तोंड दाखवायची त्यांना जागा राहिली नाही. अशावेळी येणाऱ्या निवडणुकीत मतदार त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. कारण लोकांना प्रत्येक वेळी फसवता येत नाही आणि आता लोकही काही अज्ञानी राहिलेले नाहीत. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या वर्षभरात जे काही घडले आहे त्याची लोकांच्या मनात चीड आहे. शिंदे आणि त्यांचे फुटीर साथीदार सांगत होते की राष्ट्रवादीमुळे आम्ही शिवसेनेतून बाहेर पडलो, पण नियतीने पुन्हा त्यांना राष्ट्रवादीसोबत बसायला लावले आणि ते तोंडावर आपटले. आज त्यांची स्थिती धोबी का कुत्ता घर का ना घाट का अशी झालेली आहे. कारण अजित पवारांनी भाजपासोबत संधान बांधताना अर्थ खात्यासह सगळी महत्त्वाची खाती पळवलीत. त्यामुळे शिंदे गटाच्या हाती काय राहिले बाबाजीचा घंटा? शिंदे गटाच्या नाराजीला आज महाराष्ट्राच्या राजकारणात आणि खास करून भाजपच्या लेखी कवडीची ही किंमत राहिलेली नाही. कारण आज ना उद्या अजित पवार मुख्यमंत्री पद मिळवणारच ही काळा दगडावरची रेष आहे. अशावेळी शिंदे काय करणार आहेत. त्यांचे हात दगडाखाली आहेत. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची अवस्था झाली आहे. आज परिस्थिती अशी आहे की ते भाजपची साथ सोडू शकत नाही आणि शिवसेनेत परतीचे दोर कापलेले आहेत. कारण उद्धव ठाकरेंनी भलेही त्यांना पुन्हा पक्षात घेण्याचा प्रयत्न केला, तरी शिवसैनिकांना ते मान्य होणार नाही ही वस्तुस्थिती शिंदेंच्या ही लक्षात आलेली आहे. त्यामुळे आता महायुतीच्या सरकारमध्ये तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करण्याशिवाय त्यांच्या हाती काहीही राहिलेले नाही. शिंदे गटाने केलेल्या गद्दारीची नियतीने त्यांना दिलेली ही फार मोठी शिक्षा आहे, जर त्यांनी महायुतीमध्ये उठाव करण्याचा प्रयत्न केला, तर भाजपवाले त्यांची संपूर्ण राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त करून टाकतील. त्यामुळे आता महायुतीत गुलामासारखे रहा आणि पदरी पडेल त्यात गोड म्हणून एक एक दिवस ढकला. राहता राहिला सवाल अजित पवार यांचा तर अजित पवार यांचाही भाजपवाले कधी गेम करतील हे त्यांना कळणार नाही. कारण या महाराष्ट्रात बामणीकाव्याने भल्याभल्यांना दगा दिलेला आहे. त्यामुळे अजित पवार त्यांच्या लेखी किस झाड की पत्ती आहे. भाजपचे आजवरचे युज अँड थ्रो चे धोरण या देशातील सगळ्या राजकीय पक्षांनी अनुभवलेले आहे. ज्यामध्ये जय ललितांचा अण्णा द्रमुक, ममता बॅनर्जीचा तृणमूल काँग्रेस, सुरजित सिंग बर्नालांचा शिरोमणी अकाली दल, बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना, नितीश कुमार यांचा जेडीयु आदी पक्षांचा समावेश आहे. त्यामुळे जो भाजपच्या नादी लागला तो संपला अशी भारतीय राजकारणाची स्थिती आहे. आणि हे सर्व एकाच राजकीय धुरंदर इसमाला ठाऊक आहे तो म्हणजे शरद पवार! शरद पवार कधीही भाजपच्या नादाला लागले नाही. पण त्याचबरोबर त्यांनी भाजपाला कधी दुखावले ही नाही. तरीही भाजपाने राष्ट्रवादीत फूट पाडली त्याला कारणही तसेच आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी शरद पवार देशातील सर्व विरोधी पक्ष नेत्यांची मोट बांधण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांचा हा प्रयत्न यशस्वी होऊ नये म्हणून भाजपाने राष्ट्रवादी फोडली. पण भाजपाला एक गोष्ट ठाऊक नाही की अजित पवार हा काही विश्वासू माणूस नाही. सत्ता तिकडे लोकसत्ता अशी अजित पवाराची भूमिका असते हा माणूस सत्तेशिवाय राहू शकत नाही हे अनेक वेळा महाराष्ट्रातील जनतेने पाहिलेले आहे. त्यामुळे अजित पवारांवर विश्वास टाकून भाजपाने कुठेतरी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतलाय असे आता वाटायला लागले आहेत. कारण अजित पवारांना सत्तेत सहभागी करून घेतल्यामुळे एकीकडे शिंदे गट नाराज झाला आहे, तर दुसरीकडे भाजपातील निष्ठावंत संतापलेले आहेत आणि त्याचे दुष्परिणाम पुढील काही दिवसात भाजपाला बघायला मिळतील. भाजपातील निष्ठावंतांचे एकच म्हणणे आहे की ज्या काँग्रेस राष्ट्रवादीने आतापर्यंत पंतप्रधान मोदींसह भाजपाच्या अनेक नेत्यांना शिवीगाळ केली. भाजपाच्या ध्येय धोरणांचा जनमानसात जाऊन पंचनामा केला त्यांना महायुतीत का घेतले. कारण शिंदेंना सोबत घेतल्यापासून सरकार बहुमतात आहे, मग अजित पवारांना सत्तेत घेण्याचे कारण काय? हाच प्रश्न भाजपाच्या महाराष्ट्रातील नेतृत्वाला विचारला जात आहे आणि त्याचे उत्तर देणे फडणवीस आणि त्यांच्या चेल्या चपाट्यांना कठीण जात आहे. त्यामुळे भाजपातील निष्ठावंत राजकीय नेते आणि त्यांना मानणारा महाराष्ट्रातील एक मोठा गट भाजपाच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे बाहेरचा कचरा घेऊन सरकार बनवण्याचा भाजपा नेतृत्वाचा प्रयत्न त्यांच्या अंगलट आल्याशिवाय राहणार नाही.

# इतर मागासवर्गीय युवक आणि युवतींना उद्योजक होण्यासाठी महामंडळाचा पुढाकार!

महाराष्ट्र राज्य हे नेहमीच कल्याणकारी योजना सुरु करण्यात आणि त्या राबविण्यात अग्रेसर आहे. शेवटच्या माणसाचे कल्याण हे उद्देश ठेवून शासन काम करते. काही वर्षापूर्वी इतर मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी नवीन मंत्रालय सुरु केले, महामंडळही सुरु केले. त्या महामंडळाच्या वतीने युवक-युवतींना व्यवसायीक, उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी योजना सुरु केल्या. त्या सर्व सामान्यांना कळाव्यात म्हणून म्हणून ही माहिती देत आहोत.

**बीजभांडवल योजना** : बीजभांडवल योजना राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातुन राबवीण्यात येते. यात महामंडळाचे कर्ज २० टक्के बँकेचे कर्ज ७५ टक्के व लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असतो. कर्ज सहभागांची रक्कम बँकेने एकुण मंजुर केलेल्या कर्ज रकमेवर असते. कर्ज रक्कम मर्यादा रु.५ लक्ष. कर्ज फेडीची कालमर्यादा ५ वर्षे. व्याजदर महामंडळाच्या सहभाग रकमेवर ६ टक्के व बँकेच्या सहभाग रकमेवर प्रचलीत बँक व्याज दरानुसार. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.१ लक्ष पर्यंत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे.

**थेट कर्ज योजना** : थेट कर्ज योजना महामंडळामार्फत राबवण्यात येते. कर्ज मर्यादा रु. १ लक्ष. अर्जदाराचा सिबील स्कोअर किमान ५०० इतका असावा. वय १८ ते ५५ वर्षे. परत पफेडीचा कालावधी ४ वर्षे. नियीमत कर्ज परतपफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारले जाणार नाही. (हप्ता मासीक रु.२०८५) तथापी थकीत कर्ज रकमेवर ४ टक्के व्याज आकारण्यात येते. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यंत.

**वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना** : सदर योजना बँके मापर्फत राबवीण्यात येते. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल, संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष पर्यंत. कर्ज परतपफेडीचा कालावधी बँक निकषानुसार. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थींच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र लाभार्थींस एल.ओ.आय.(Letter Of Intent) दिले जाईल. त्याआधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

**गट व्याज परतावा योजना** : गट व्याज परतावा योजना बँकेमार्फत राबविण्यात येते. महामंडळाच्या निकषानुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील बचतगट भागीदारी, सहकारी संस्था शासन प्रमाणीत. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष ते ५० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल, संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. गटातील सर्व लाभार्थींचे खाते आधार लिंक असणे अनिवार्य. गटातील लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे. गटातील भागीदारांचे खाते किमान रु. ५०० कोटींच्यावर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टीम असलेल्या राष्ट्रीयकृत, शेड्युल्ड बँकेत खाते असावे. गटातील सदस्यांनी यापुर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेतलेला नसावा. गटातील सर्व सदस्यांचा सिबील स्कोअर किमान ५०० असावा. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे वा कर्ज कालावधी यापैकी जो कालावधी कमी असेल तो. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थींच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र गटास एल.ओ.आय. दिले जाईल. त्या आधारे बँकेकडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल.

**शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना** : शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजना बँकेमापर्फत राबवण्यात येते. बँक कर्ज रकमेवरील व्याज परतावा. देशांतर्गत व परदेशी उच्च शिक्षणासाठी रु.१० लक्ष व २० लक्ष पर्यंत अनुक्रमे. विद्यार्थीचे वय १७ ते ३० वर्षे. अर्जदाराची कौटुंबीक वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष. अर्जदार १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा. देशांतर्गत अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन, कृषी, अन्नप्रक्रीया व पशुविज्ञान, परदेशी अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या कर्जामध्ये फक्त शैक्षणीक शुल्क, पुस्तके व साहीत्य खरेदीचा सामावेश राहील. परदेशी अभ्यासक्रमांसाठी टड (Quacquarelli Symonds) रँकींग / गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील. परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्र परिक्षा GRE (Graduate Record, TOEFL (Test of English as Foreign Language) परीक्षा उत्तीर्ण.

**पात्रतेचे निकष** : लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा इतर मागासवर्गीय रहीवासी असावा. तो महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्याचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा. कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे रहातील.

**अर्जासोबत जोडवयाच्या कागदपत्रांचा तपशिल** : उत्पन्नाच्या दाखल्यासोबतसक्षम अधिकाऱ्याने अर्जदार प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती. जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणीत प्रत, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो. व्यवसाय स्थळाची भाडेपावती, करारनामा, सातबारा, उतारा, लाईट बील प्रत. शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला. दोन जामिनदारांचे हमीपत्र अथवा गहाणखत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत 'ना हरकत' प्रमाणपत्र तसेच ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजुर होणार आहे त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र. तांत्रिक व्यावसायाकरिता आवश्यक असतील असे परवाने, लायसन्स. व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादींचे दरपत्रक. महामंडळाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कागदपत्रांचा तपशील. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ महामंडळाच्या इतर मागास प्रवर्गातील सुशिक्षीत व बेरोजगारासाठी कृषी, व्यापार व उद्योग सुरु करण्यासाठी खालील प्रमाणे कर्ज योजना राबविल्या जातात. योजनांच्या अधिक माहिती व इतर तपशीलासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ म. पहिला मजला, जात पडताळणी इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर, गुळ मार्केट, लातुर या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि. लातूरचे जिल्हा व्यवस्थापक पी.सी. पोहरे यांनी आवाहन केले आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण योजना** : राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभ व्हावा तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना कौशल्यपुर्ण बनविणे व त्याव्दारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे. शिक्षण १० वी उत्तीर्ण. महामंडळाच्या MSSDSच्या वेबपोर्टलवर उमेदवाराने नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, एकत्र कुटुंबाचे उत्पन्न प्रमाणपत्र (८ लक्ष पर्यंत) वयाचा दाखला, रहिवासी दाखला, आधार कार्ड अपलोड करावे लागेल. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या सेवा, नोकऱ्यांची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षण अभ्यासक्रम महामंडळामार्फत निवडण्यात येईल. महामंडळाने निवड केलेल्या अभ्यासक्रमातुन उमेदवारास त्याच्या कल चाचणीच्या आधाराव अभ्यासक्रमाची निवड करता येईल. स्किल इंडीया पोर्टलवर नोंदणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संपुर्ण प्रशिक्षण महामंडळामार्फत देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान दैनंदिन हजेरी अनिवार्य राहील.

# मागास समुदायांची परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वाची -राष्ट्रपती मुर्मू



देशातील मागास समुदायांची परिस्थिती बदलण्यासोबतच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज गडचिरोली येथे केले. गडचिरोली येथे झालेल्या गोंडवाना विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभ व अडपल्ली येथील विद्यापीठाच्या प्रस्तावित इमारतीच्या कोनशिला समारंभास राष्ट्रपतींची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय महामार्ग व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे आदी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू पुढे म्हणाल्या की, गोंडवाना विद्यापीठाच्या अथक परिश्रमातून स्थानिक आदिवासी, मागास घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून चांगली संधी मिळाली आहे. अतिशय कमी खर्चात उपलब्ध झालेल्या उपयुक्त शिक्षणातून या ठिकाणी विद्यार्थी घडत आहेत. या विद्यापीठात चांगल्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून कौशल्यपूर्ण शिक्षण दिले जात आहे. त्याचा लाभ येथील पर्यावरण, नैसर्गिक साधनसंपत्ती व परंपरा जपण्यासाठी होईल. या भागातील अनेक आदिवासी समूह राष्ट्रपती भवनात आपणास भेटण्यासाठी येत असल्याचे सांगून राष्ट्रपती मुर्मू पुढे म्हणाल्या की, या घटकांकडून संपूर्ण देशाला शिकण्यासारखे बरेच काही आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आकांक्षित जिल्हा कार्यक्रमातून स्थानिक विकासाला चांगली चालना दिली आहे. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांनी मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपले प्रयत्न व जिद्द कायम ठेवावी. गोंडवाना विद्यापीठाचे नाव जागतिकस्तरावर जाईल याची मला खात्री आहे. गोंडवाना विद्यापीठाची ओळख एक परिपूर्ण आदिवासी विद्यापीठ व्हावी, अशी इच्छा व्यक्त करून राज्यपाल श्री. बैस पुढे म्हणाले की, विद्यापीठासाठी १७० एकर क्षेत्रावर येत्या काळात १५०० कोटी रुपये खर्च करून विविध पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. विद्यापीठाने गेल्या १२ वर्षात चांगली प्रगती केली आहे. ३९ टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या या जिल्ह्यात विद्यापीठाची भूमिका महत्त्वाची आहे. महाविद्यालय बाह्य असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये या विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षणाची गोडी निर्माण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले की, गडचिरोली जिल्हा मागास, दुर्गम आहे. याचे कारण पायाभूत सुविधांचा अभाव होता. मात्र आता रस्ते, उद्योग, शिक्षण, आरोग्य आदी सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या आहेत. उपमुख्यमंत्री व वनमंत्री यांनी या जिल्ह्यासाठी अनेक कामे मंजूर केली आहेत. रेल्वे, विमानतळ, लोहप्रकल्प यामुळे येथे गुंतवणूक वाढणार आहे. या सर्व प्रक्रियेत गोंडवाना विद्यापीठाची भूमिका महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गोंडवाना विद्यापीठाच्या दीक्षांत कार्यक्रमासाठी येथे येऊन राष्ट्रपती महोदयांनी गडचिरोली जिल्ह्याचा सन्मान वाढविला आहे. गडचिरोली जिल्हा हा जल, जंगल, जमीन आणि खनिज संपत्तीने समृद्ध आहे. या जिल्ह्यामध्ये उत्कृष्ट प्रकारचे लोहखनिज असून २० हजार कोटींची गुंतवणूक येथे होत आहे. या जिल्ह्याच्या विकासात गोंडवाना विद्यापीठाचेही योगदान महत्त्वाचे आहे. राज्य सरकार विद्यापीठासाठी जमीन तसेच निधीची कमतरता कधीही पडू देणार नाही. गडचिरोलीत वैद्यकीय महाविद्यालय, विमानतळ, रेल्वे आदी सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत आहे. या माध्यमातून येथे रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल. गडचिरोली जिल्ह्याची आदिवासी संस्कृती ही आपला एक समृद्ध वारसा आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून या संस्कृतीचे जतन होऊन ती आणखी विकसित होईल. या जिल्ह्यातील नक्षलवादी चळवळ संपुष्टात येत आहे. येथील नागरिक आता मुख्य प्रवाहात येऊन जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावत आहे, असेही ते म्हणाले. प्रारंभी राज्यपाल श्री. बैस यांनी राष्ट्रपतींचे स्वागत केले. राष्ट्रपतींच्या हस्ते अमित रामरतन गोहने (मानव विज्ञान विद्याशाखा), अर्पिता पुरुषोत्तम ठोंबरे (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा), लोकेश श्रीराम हलामी व सदाफ नफीस अहमद अन्सारी (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), संतोष प्रकाश शिंदे (आंतर विज्ञान विद्याशाखा) यांना सुवर्णपदक, तर सारिका बाबूराव मंथनवार यांना शिक्षणशास्त्र या विषयात आचार्य पदवी प्रदान करण्यात आली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# रहिवाशी प्रकल्पातील एका इमारतीमध्ये अनधिकृत कॉल सेंटर चालवून परदेशी नागरीकांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद!

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील नाणे गावाच्या हद्दीतील मेगावीला या रहिवाशी प्रकल्पातील एका इमारतीमध्ये अनधिकृत कॉल सेंटर चालविले जात असल्याची माहिती पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना गोपनीय सूत्रांकडून मिळाली होती. शुक्रवारी(दि. १३जुलै) मिळालेल्या माहिती वरून उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग शैलेश काळे, वाडा पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी पोलीस पथक तयार करून छापा टाकून कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे शैलेश काळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी पोलीस पथक तयार करून शनिवारी (दि.१४ जुलै) रात्री १२ वाजता सदर इमारतीमध्ये छापा टाकला असता एकुण ६ फ्लॅटमध्ये एकूण २३ आरोपी त्यांचे इतर साथीदार हे अनधिकृत कॉल सेंटर चालवीत असताना आढळून आले.



याबाबत चौकशी केली असता सदर आरोपी हे आपसात संगणमत करुन लॅपटॉप व मोबाईलद्वारे इंटरनेटचा वापर करुन ु-श्रळींश, शूशलशरा, ु-ींशप या ॲप्सचा वापर करुन कॅनडा येथील नागरीकांचा मोबाईल फोन नंबर, नाव व इतर माहिती बेकायदेशिररित्या प्राप्त करुन, संबंधितांना आपण ॲमेझॉन ॲपवर ऑर्डर न केलेल्या वस्तु, साहित्य, गिफ्ट्स किंवा इतर महागड्या वस्तु या ऑर्डर केल्याचे भासवुन, सदरची ऑर्डर कॅन्सल करण्यासाठी आपण १ प्रेस करा असा सल्ला देत असत, संबंधितांनी १ नंबर प्रेस केल्यास बोगस कॉल सेंटरला संबंधित व्यक्तीचा फोन कनेक्ट होत असे. सदरचा फोन कनेक्ट झाल्यास आरोपीत इसम हे त्यांना लिहुन दिलेल्या स्क्रिप्ट नुसार त्या व्यक्तीशी बोलत असत व त्यानुसार संबंधित व्यक्तीकडुन माहिती घेऊन संबंधितांनी टाळाटाळ केल्यास तुमचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा रोबोटीक कॉल, व्हाईस कॉल करुन त्यांना घाबरवून त्यांचेकडुन बिटकॉईन वॉलेट मार्फत काही रक्कम देण्यास भाग पाडले जात असे. अशा प्रकारे आरोपीतांनी वरील ॲपचा वापर करुन कॅनडा व इतर देशातील नागरीकांची मोठया प्रमाणात फसवणुक केलेली आहे. यातील आरोपींना अटक केलेली असून त्यांचेविरूध्द वाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढिल तपास पोलीस निरीक्षक अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर हे करीत आहेत. सदरची कारवाई बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली शैलेश काळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, सुरेश कदम, पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक दिपाली भाते, बोईसर पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक गणेश तारगे, चंद्रकांत हाके, हिम्मतराव सरगर, विजय डाखोरे, मयुरेश अंबाजी, संतोष वाकचौरे, पल्लवी बाणे, एच. के. जाधव, पोलीस हवालदार गुरुनाथ गोतारणे, मोहन पाटील, विजय मढवी, प्रविण काळे, सुचन पाटील, आशा पाटील, पोलीस नामदार कृष्णा शेंडे, गणेश पहाड, ज्ञानेश्वर पवार, पोलीस शिपाही गजानन जाधव, सचिन भोये, चेतन सोनावणे, हरेश काळे, कमळाकर पाटील, भुषण खिल्लारे, रामदास दुर्गेष्ट, क्षत्रिय, राहुल पाटील सर्व नेमणूक सायबर सेल, पालघर यांनी केलेली आहे.

# नाल्यावर बसून श्राद्ध आणि भजन कीर्तन आंदोलन २५ कोटीं निधीचा खर्च केला कुठे? नागरीकांचा सवाल



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

उल्हासनगरमध्ये पावसाच्या पाण्यामुळे नाला खचला आहे. या नाल्या शेजारीचं नागरिकांचे घर आहे. नाला खचल्यामुळे घराला तडे गेले आहेत. त्यामुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता आहे. महापालिकेचं दुर्लक्ष असल्याने स्थानिक समाजसेवक राधाकृष्ण साठे यांनी अनोख्या पद्धतीने श्राद्ध व भजन आंदोलन केलंय. कॅम्प-४ येथील गणेश नगर सेक्शन ३९ भाटिया रोड परिसरात राधाबाई छबन नेटके यांचे घर पावसाच्या पाण्यामुळे पडले आहे. त्यांची घरची परिस्थिती बेताची आहे.घरात कमावत कोणी असल्याने घर बांधण्यासाठी खर्च कोण करणार असा यकक्ष प्रश्न उभा ठाकलाये.घराच्या बाजूला वाहणाऱ्या मोठ्या नाल्याची संरक्षण भिंत खचलीये. महापालिका आणि तहसीलदार यांना वेळोवेळी अनेक निवेदन देऊन ही लक्ष देत नसल्याने समाजसेवक राधाकृष्ण साठे यांनी अखेर अनोख्या पद्धतीने नाल्यासमोर श्राद्ध व भजन आंदोलन केलंय. या स्थानिक माजी नगरसेवकाने २५ कोटींचा निधी आला अस सांगता हा निधी गेला कुठं आरोप त्यानी केलाये. यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थिती होते.

# उल्हासनगरात शासकीय दाखले वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर मध्ये बहुजन समाज पार्टीच्या वतीने एक दिवसीय शासकीय दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आलंय.विद्यार्थ्यांची कॉलेज प्रवेशाची लगबग सुरू होते. प्रवेशासाठी लागणारे दाखले मिळवण्यासाठी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात तहसील कार्यालयात गर्दी करतात. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये हा शिबीराचा उद्देश आहे. शैक्षणिक प्रवेशासाठी शासकीय दाखले जमा करण्यासाठी विद्यार्थी, पालक यांची दमछाक होते त्यामुळेच 'शासन आपल्या दारी'या अभियना अंतर्गत उल्हासनगर मध्ये बहुजन समाज पार्टीने एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आलंय. उत्पन्न दाखला, रहिवाशी दाखला, जेष्ठ नागरिक दाखले उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वडोलगाव येथील सेंट जोसेफ शाळेजवळ शिबीराचे आयोजन करण्यात आले.

बहुजन समाज पार्टीचे महासचिव आतीश जाधव यांनी शिबीराचे आयोजन केलं.यावेळी बहुजन समाज पार्टीचे शहर अध्यक्षा निवेदिता जाधव, सामाजिक कार्यकर्ते किरण जाधव, प्राध्यापक विकास जाधव, मनीषा पंडाव, सदाशिव मढावी संदीप जाधव, साहिल जाधव, रोहन जाधव, हरिवंश अडके यांनी परिश्रम घेतले.

## वित्तीय साक्षरता परीक्षा संपन्न

लातूर : भारतीय रिझर्व्ह बँक, जिल्हा अग्रणी बँक लातूर आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी वित्तीय साक्षरता परीक्षा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृह येथे घेण्यात आली. आर्थिक समावेशनाचे उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाने जिल्ह्यातील दहा तालुक्यांमधील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय परीक्षा आयोजित केली होती. या वित्तीय साक्षरता परीक्षेत जिल्ह्यातील दहा शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला किनगावच्या विद्यार्थिनी कु. अपेक्षा बालाजी कांबळे व कु. अदिती अंबादास कांबळे यांनी प्रथम पारितोषिक पटकावित राज्यस्तरीय फेरीसाठी त्यांची निवड झाली आहे.

# सफाळे रेल्वे प्लॅटफॉर्म दोन वरील एस्केलेटेरचे लोकार्पण



**सफाळे/प्रतिनिधी**

सफाळे रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म २ वरील सरकताजिना / एस्केलेटर लोकार्पण सोहळा राजेंद्र गावीत - खासदार पालघर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून करण्यात आला. सफाळे रेल्वे स्थानकात सातत्याने रेल्वे प्रवासी वर्गाचे वाढते प्रमाण पाहता, जेष्ठ नागरिक, महिला वर्ग, दिव्यांग यांच्या साठी सरकताजिना (एस्क्युलेटर) यांची निनांत आवश्यकता होती. ती प्लॅटफॉर्म नंबर २ वर पुर्ण होत आहे. परंतु अश्याच प्रकारे सुविधा प्लॅटफॉर्म नंबर १ वर सुध्दा करण्यात यावी. याबद्दल डहाणू वैतरणा प्रवासी संघटना पदाधिकारी व दैनंदिन रेल्वे प्रवासी यांच्या कडून मा. खासदार साहेब यांच्याकडे करण्यात आली आहे. सफाळे पश्चिमेस असलेली तिकीट खिडकी जी सकाळ पासून दुपारपर्यत अर्धवेळ सूरू असते ती पुर्ण वेळ सुरू ठेवावी. सफाळे पुर्वेकडे जाण्या येण्यासाठी साठी असलेला जिना प्रवासी यांच्या साठी गैरसोयीचा असून, त्यात योग्य फेरबदल करावा. आदी गैरसोयी बद्दल खासदार साहेब यांच्या कडे विनंती वजा तक्रारी, प्रवासी संघटनेचे प्रतिनिधी यांच्या मार्फत दैनंदिन प्रवासी यांच्या वतीने करण्यात आलेल्या आहेत. यावर रेल्वे अधिकारी, सफाळे रेल्वे स्टेशन प्रबंधक काय निर्णय घेणार ते कळेलच. या बद्दल मा. खासदार साहेब यांनी सफाळे रेल्वे स्टेशन प्रबंधक, रेल्वे अधिकारी यांना योग्य त्या सूचना सर्वान समक्ष दिलेल्या आहेत. या प्रसंगी राजेंद्र गावीत खासदार यांच्या केदार काळे-शिवसेना प्रवक्ते (शिंदे गट) तथा पश्चिम रेल्वे डी. आर.यु.सी. सदस्य मुंबई सेंट्रल. जतन कदम सर-अध्यक्ष सफाळे स्टेशन कमिटी, सफाळे रेल्वे स्टेशन प्रबंधक चुन्नीलाल आगळेसर, राजेंद्र पांचाळ, देशपांडे-मॅनेजर, डी.एफ.ही.सी.आर. इलेक्ट्रीएशन अधिकारी-कर्मचारी, ए.सी.एम. -सी.एम.आय. अधिकारी - कर्मचारी, रेल्वे सुरक्षाबल अधिकारी - कर्मचारी, सफाळे पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी अमोल गवळी सहा.पो. निरीक्षक, कैलास शेळके पो. नाईक व इतर कर्मचारी, डॉ. सुर्यवंशी, स्थानिक प्रवासी पत्रकार, जेष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होते.

# सुप्रीम कॉलनी दगडफेकी प्रकरणातील गुन्हे रद्द करून निष्पाप संशयितांची सुटका करा; नागरिकांची मागणी

**जळगाव/प्रतिनिधी**

९ जुलै रोजी दोन गटात झालेल्या दगडफेकीत एका गटावर भादवी ३०७ प्रमाणे गुन्हा नोंदवून ८ आरोपींची नावे व १० अज्ञात आरोपीच्या विरोधात एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल आहे. दुसऱ्या गटातील १४ तरुणाविरुद्ध साधा दंगलीचा गुन्हा दाखल असल्याने हा अन्याय व भेदभाव असल्याने ते त्वरित दूर करा व ज्या तरुणाविरुद्ध भादंवी ३०७ प्रमाणे गुन्हा नोंद झालेला आहे, त्यातील ३०७ कलम रद्द करण्यात यावे, तसेच ज्यावेळी दगडफेक झाली त्यावेळी इसरार बाबर देशमुख व जुबेर नुरा देशमुख हे दोघी आपआपल्या कामानिमित्त बाहेरगावी असताना सुद्धा त्यांची नावे एफआयआरमध्ये लिहिण्यात आली. त्यांचे कागदपत्रे पुरावे बघून त्यांची नावे त्वरित




कमी करण्यात यावी तसेच दोघा बाजूंकडून ज्यांनी दगडफेक केली आहे. त्या दोन्ही समाजातील तरुणांवर एकाच प्रकारे न्याय भूमिका घ्यावी अशा तीन मागण्याचे निवेदन पोलीस उपविभागीय अधिकारी संदीप गावित यांना बुधवारी संध्याकाळी देण्यात आलेले आहे. जो कोणी दंगलीमध्ये नसेल तर त्याचे नाव नजर चुकीने किंवा साम्य नावामुळे आले असेल तर ती नावे कमी करण्यात येतील. तसेच तपास प्राथमिक स्वरूपात असल्याने भादवी ३०७ हे कलम पूर्ण चौकशी झाल्यावर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तसेच दोघांकडे ज्या तरुणांनी कृत्य केलेले आहे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला पोलीस उप विभागीय अधिकारी संदीप गावित यांनी दिले. दरम्यान जे लोक दगडफेकी च्या भीतीमुळे व पोलिसांच्या कारवाईमुळे आपली घरे सोडून निघून गेलेली आहे त्यांनी भीती न बाळगता आपल्या घरी परत यावे असे आवाहन सुद्धा सुप्रीम कॉलनी परिसरातील नागरिक व पोलिसांनी संयुक्तरीत्या केलेले आहे.

यावेळी मनीयार बिरादरीचे अध्यक्ष फारुक शेख, ॲड. वसिम काझी व ॲड. इमरान शेख,आसिफ हाजी, राजू पटेल, वाहेद सेठ, अकील मन्यार, मजीद पटेल, रऊफ खान, मंजूर पटेल, रमजान पटेल, आझाद पटेल, मुजाहिद पटेल, शब्बीर पटेल, अफजल मिया, पटेल बिर्याणी, आदींचा समावेश होता.

# आता बोर्डाची परीक्षा वर्षातून दोन वेळा; नवीन शैक्षणिक धोरण जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

राज्य सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले असून यात एका वर्षात दोन वेळा बोर्डाच्या परीक्षा व बारावीच्या इयत्तेत सेमिस्टर प्रणाली लागू करण्यात येणार आहे. शिवाय, इतरही बदल करण्यात आले असून या धोरणाचे मराठवाडा पालक संघाच्यावतीने स्वागत करण्यात आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या स्वरूपात बदल सूचवले आहेत. या मसुद्यात वर्गात विद्यार्थ्यांना बसण्याची व्यवस्था, कपडे, भाषा व संस्कृतीशी संबंधित इतर विषयांवरही प्रस्ताव देण्यात आले आहेत. यात विद्यार्थ्यांच्या विकासावर भर देण्यात आला असून संतुलित आहार, पारंपारिक खेळ, योगासने याद्वारे मुलांच्या नैतिक विकासावर भर देण्यात येणार आहे. शैक्षणिक संरचनेतही बदल करण्यात आले आहेत. अकरावी आणि बारावीमध्ये वर्षअखेरीस एका परीक्षेऐवजी मॉड्युलर बोर्ड परीक्षा वर्षातून दोनदा घेण्याचा व दोन्ही सेमिस्टरचे गुण



एकत्र करून मूल्यमापन करण्यात येणार असल्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे. या शैक्षणिक धोरणाचे स्वागत करून मुखयमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचे मराठवाडा पालक संघाचे अध्यक्ष डॉ. भारत घोडके व सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी आभार मानले आहेत.

# बदलापूर येथे डॉक्टरने केले गतीमंद मुलावर अत्याचार



**बदलापूर/सुनील तांबे**

बदलापूर मांजर्ली परिसरातील घटना. २३ वर्षीय गतिमंद तरुणीवर डॉ..ने केले अत्याचार. मांजर्ली परिसरातील सोनवणे क्लिनिक मध्ये हा प्रकार घडला. या प्रकरणी डॉक्टरवर बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात अत्याचार प्रतिबंध व ॲट्रॉसिटी कायद्यानुसर गुन्हा नोद करून अटक करण्यात आली. बदलापूर पश्चिम पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण क्षिरसागर यांनी दिलेल्या माहिती नुसार.बदलापूर पश्चिम भागातील मांजर्ली गावातील दीपाली पार्क जवळ नव्हश्री साईकृपा सोसायटीत आरोपी डॉ. हेमंत सोनवणे यांचे क्लिनिक आहे. या परिसरातून जाणाऱ्या एका गतिमंद तरुणीला डॉक्टरने आत बोलवून, आणि एकटी असल्याचा गैरफायदा घेत तिच्यावर अतिप्रसंग केला. दुपारी पीडितीला घरच्यांनी किराणा दुकानातून मसाला आणायला सांगितला, ती तरुणी दुकानात मसाला आणायला गेली, पण परत घरी येण्यास उशीर झाल्याने शोधा-शोध सुरु केली. बहीण शोधत दुकानावर गेले असता दुकानदाराला विचारणा केली. दुकान मालकाने मसाला घेऊन गेली असे सांगितले. पण पीडित घरी पोहचली नाही. घरी परतत असताना डॉ.हेमंत प्रसाद सोनवणे यांचे क्लिनिक आहे. क्लिनिक बाहेर पीडितीची चप्पल दिसली. चप्पल दिसल्या मुळे त्याना धीर आला. पण क्लिनिकचा दरवाजा उघडताच डॉ . हेमंत विचित्र अवस्तेत दिसला. त्या परिस्तिथीत आढळ्या मुळे शंका निर्माण झाली. आणि पोलीस स्टेशला कळवण्यात आले. पोलीस घटनास्थळी दाखल होत पोलिसांनी डॉ. हेमंत याला ताब्यात घेतले. पीडित तरुणीला विचारणा केली असता घडलेला प्रकार सांगितला.घरच्यांच्या तकरारीवरून अत्याचार प्रतिबंध वभारतीय दंड संहिता अनुसूचित आणि अनिसूचित जाती जमाती अत्याचार प्रतीबंधकायद्याच्या संबंधित इतर तरतुदी नुसार गुन्हा नोंदऊन, कायदेशीर कारवाई पूर्ण करून अटक करण्यात आली, अधिक तपास वरिष्ठच्या मकर्गदर्शना खाली पोलिस पथक करीत आहे.

# बसपाच्या सारोळा रोड आणि नांदेड रोड शाखांचे प्रदेशाध्यक्ष ॲड.संदीप ताजने यांच्या हस्ते उद्घाटन

**लातूर/करकरे अंबादास**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात बहुजन समाज पार्टीचे पक्षसंघटन वाढीसाठी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लातूर जिल्हाध्यक्ष प्रा. विश्वनाथ आल्टे यांच्या नेतृत्वात जिल्हाभरात बसपाच्या शाखा, बूथ स्थापना करण्यात येत आहेत. लातूर शहरातील सारोळा रोड आणि सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटी नांदेड रोड या दोन शाखांचे बुथची स्थापना बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. संदीप ताजने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बसपाचे प्रदेश प्रभारी मनीष आनंद, राज्य प्रभारी मनीष कावळे, लातूर जिल्हाध्यक्ष प्रा. प्रा. विश्वनाथ आल्टे, लातूर जिल्हा प्रभारी उदय सोनवणे माजी जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे, बरगे सर,उपाध्यक्ष ज्योतीराम लामतुरे कोषाध्यक्ष शंकर जाधव गौतम वाघमारे गौतम सोनवणे उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष वाघमारे साहेब आदींची



उपस्थिती होती.

नांदेड रोड येथील सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटीच्या बूथ अध्यक्षपदी आशुतोष ओव्हाळ, उपाध्यक्ष सुजित सूर्यवंशी, सचिव-प्रथमेश आल्टे, सहसचिव- अभय कांबळे, तर संघटकपदी सुजित कुमरा, अभय कांबळे, बाळू क्षीरसागर, अमोल लवटे, बाळू बडे, धनगर भरत, कुलदीप भुताळे, निलेश चिंताळे, अजय मेहता, महेश गायकवाड आदींची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. तसेच सारोळा रोड येथील बूथ अध्यक्षपदी लक्ष्मण उर्फ लकी गायकवाड, उपाध्यक्षपदी राहुल हुलगुयंडे, सचिव- ओमकार अडगळ, सहसचिव- अभय कांबळे, तर संघटकपदी महेश गायकवाड, तुकाराम नागिमे आदी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# शालेय शिक्षण मंत्री दीपकभाई केसरकर यांच्या सोबत कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्याची सभा संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातील शिक्षक आणि विद्यार्थीच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी कास्ट्राईब शिक्षक संघटने सोबत मा.नामदार दीपकभाई केसरकर, शालेय शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सभा विस्तारित मंत्रालय इमारत सातवा मजला परिषद सभागृह क्र५ मध्ये संपन्न झाली. या सभेमध्ये संघटनेचे राज्याध्यक्ष मा. रविंद्रजी पालवे, राज्य सरचिटणीस आकाशजी तांबे यांनी मागासवर्गीय शिक्षकांचे २१ प्रश्न शासन दरबारी मांडले या सर्व प्रश्नावर संगोपन चर्चा होऊन बरेचसे प्रश्न आज निकाली काढण्याचे आदेश माननीय मंत्री महोदयांनी संबधितांना दिले.

राज्यातील बीएड, डीएड बेरोजगार तरुणांना शिक्षण सेवक म्हणून नोकरीची संधी मिळावी . मागासवर्गीयांचा भरती मधील अनुशेष दूर करावा संघटनेच्या या प्रमुख मागणीवर मा.मंत्री महोदयांनी येत्या महिनाभरात पवित्र पोर्टल द्वारे राज्यातील ३० हजार शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले.व त्यासाठी सर्व जिल्हा परिषदांचे रोस्टर अद्यावत करून घेण्याच्या सूचना मा.शिक्षण आयुक्त यांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येतील असे सांगितले. या सभे करता व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त मा. सुरज मांढरे उपस्थित होते. मा.शालेय शिक्षण मंत्री महोयांनी पवित्र पोर्टलनुसार ६० हजार शिक्षण सेवकांची भरती करावयाची आहे. परंतु ६७ हजार शाळापैकी ८ हजार शाळांचे अजूनही आधार अपडेशन प्रक्रिया ८५ % टक्केचेवर झाली नसलेने त्यांची संचमान्यता झालेली नाही त्यामुळे या शाळा ऑनलाईन ला दिसत नाहीत त्यांनी ही प्रक्रिया ताबडतोब करावी. त्याशिवाय भरती प्रक्रियेस रिक्त पदांची संख्या बरोबर उपलब्ध होणार नाही तसेच सर्व जिल्हा परिषदांनी ,महानगरपालिका व नगर परिषद, शासन अनुदानित संस्थांनी आपली रोस्टर बिंदुनामावली अद्ययावत करून ती मागासवर्गीय कक्षा कडून तपासून घ्यावी अशी सूचना दिल्या आहे. यावेळी उपसचिव तुषार महाजन,उपसचिव करपते, सहसंचालक देविदास कुलाल, डॉ.श्रीराम पानझाडे सहसंचालक आयुक्त शिक्षण कार्यालय हे उपस्थित होते. तसेच मंत्रालयातील शिक्षण खात्याशी संबंधित सर्व अधिकारी यावेळी उपस्थित होते. आजच्या बैठकीमध्ये खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. विषय शिक्षकांना ३३ % अट रद्द करून सर्व पदविधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी. यावर माननीय मंत्री महोदयांनी सर्व पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केली जाईल.लवकरच यावर शासन निर्णय होईल असे सभागृहात सांगितले. राज्यातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. *यावर मा. मंत्री महोदयांनी सांगितले की शासनाने यासंबंधी समिती गठीत केली आहे समितीचा अहवाल आल्यानंतर यावर उचित निर्णय होईल. संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेकडील सर्व शिक्षकाची पदोन्नती प्रक्रिया रखडली असल्याची सांगण्यात आले या विषयी मंत्री शालेय शिक्षण यांनी जिल्हा परिषद शिक्षकांच्या पदोन्नती बाबत कार्यवाही त्वरित करण्यासाठी मा.आयुक्त शिक्षण यांना संबंधित शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना पत्र देण्याचे सांगण्यात आले, विभागीय परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख पदांची भरती होत असताना प्रत्येक जिल्हा परिषदेने आपले सामाजिक आरक्षण जाहीर करावे याबाबत चर्चा झाली यावर मंत्री महोदयांनी सामाजिक आरक्षणाच्या बाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे मार्गदर्शन घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. राज्यातील जि .प. शिक्षकांचे वेतन वेळेत व्हावे यावर चर्चा झाली यासाठी राज्यस्तरावर कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला असून यासंबंधी लवकरच कारवाई होईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तात्काळ आदा करणे तसेच महागाई भत्ता फरक , ७ वा वेतन आयोग थकीत हफ्ते जमा करणे बाबत चर्चा झाली यावर माननीय मंत्री महोदयांनी पावसाळी अधिवेशनामध्ये या सर्व रकमांची पुरवणी मागणी मान्य करून संबंधितांना लवकरच त्यांची बिले अदा केल्या जातील असे सांगण्यात आले. इयत्ता ८ वी एनएमएमएस मधील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना सारथी कडून जशी शिष्यवृती दिली जाते तशीच मागास वर्गीय गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना बार्टी कडून शिष्यवृती द्यावी. सामाजिक न्याय विभागाचा विषय आहे.तरीही या विषयी सामाजिक न्याय मंत्री महोदयांशी चर्चा करून न्याय दिला जाईल. राज्यशासनाच्या ऊझड योजनेचा हिशोब देऊन केंद्रशासनाच्या छझड योजनेची अमंलबजावणी करणे.यावर कार्यवाही सुरू आहे, असे शासनाकडून सांगितले. इतर कर्मचाऱ्यां प्रमाणे जिल्हा परिषद, मनपा, खाजगी अनुदानित पात्र शिक्षकांना (१०,२०,३०) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावी. मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी उपसचिव यांना प्रस्ताव तयार करून (१०,२०,३०) हा विषय कॅबिनेट च्या बैठकीत घेवा अशी सूचना केली. १ जानेवारी २००४ नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणीत होणाऱ्या वेतन त्रुटींचे निराकरण करून बक्षी समितीचा खंड - २ प्रसिद्ध करणेत यावा. वैदयकिय उपचारासाठी शिक्षकांना कॅशलेस सुविधा उपलब्ध करणेत यावी . वैद्यकीय उपचारासाठी राज्यातील कोणत्याही कर्मचाऱ्याला कॅशलेस सुविधा दिलेली नाही मात्र भविष्य काळात यावर विचार केला जाईल. राज्यातील मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कमा विनाविलंब प्राप्त होणेबाबत कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले. जिल्हा परिषद विषय शिक्षक पदोन्नती करताना टीईटीची अट रद्द करून ताबडतोब पदोन्नत्या कराव्या. या विषयी संघटनेचे म्हणणे बरोबर आहे.२०१३ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांना टिईटी लागू आहे त्यामुळे त्या पूर्वीच्या विषय शिक्षकांना टी ई टी ची अट लागू होणार नाही.याविषयी संबंधित शिक्षणाधिकारी यांना सूचना देण्यात येईल असे उत्तर शासनाकडून मिळाले.

जिल्हा परिषदेच्या शाळांना विज्ञान शिक्षक मिळावा म्हणून शासनाने २०१६ मध्ये शासन निर्णय केला.. की १२ वी विज्ञान शाखेतून पास झालेल्या शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणीत घ्यावे व त्यांना विज्ञान विषयाची पदवी संपादन करण्याची अट घातली होती. मात्र आता सदर शासन निर्णय रद्द करून अशा शिक्षकांना पुन्हा मूळ जागेवर ठेवा.. ज्या शिक्षकांना २०२२ मध्ये विज्ञान विषय शिक्षक म्हणून घेतले आहे (उदा.सोलापूर जिल्हा ५०० विज्ञान शिक्षक) त्यांना पुढील ३ वर्षे पदवी प्राप्त करण्यासाठी मुदत वाढ द्यावी अशी मागणी कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली..या विषयी मंत्री महोदयांनी तसा शासन निर्णय काढा अशी सूचना संबंधीत सचिवांना केली. राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना रजा रोखणाचे लाभ देण्याबाबत यासंबंधी शासन स्तरावर तपासणी करून लाभ देण्यात संबंधी कारवाई करण्यात येईल. अनुसूचित जाती जमातीच्या मुलींसाठी 'स्वधार' योजनेसाठी १५० कोटीची तरतूद करण्याबाबत. हा सामाजिक न्याय विभागाच्या विषय आहे. त्या बाबतीत आपण सामाजिक न्याय विभगामार्फत विषय मार्गी लावण्यासाठी आश्वासन दिले. खाजगी माध्यमिक शाळेत कार्यरत अर्धवेळ ग्रंथपालाची सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात येऊन त्याची उन्नयन प्रक्रिया त्वरित राबविण्यात यावी. विषयी कार्यवाही सुरू केली असल्याचे उपसचिव महाजन यांनी उत्तर दिले. खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या बदल्यांबाबत शासन निर्णय करावा. अनेक शिक्षण संस्था मागासवर्गीय शिक्षकांना त्रास देण्यासाठी ६-६ महिन्यांनी बदली करतात. यावर खाजगी शाळांच्या सेवा शर्ती नियमावलीत दुरुस्ती करून शासन निर्णय केला जाईल असे आश्वासन दिले. खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांच्या सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मध्ये दुरुत्या कराव्या व त्यासाठी अभ्यास गट नेमावा. या विषयी शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. राज्यातील अनेक शिक्षणाधिकारी अँटी करप्शन च्या जाळ्यात अडकतात व त्यामुळे राज्याच्या शालेय शिक्षण विभागाची प्रतिमा मलिन होत आहे राज्यातील शिक्षणाधिकारी अनेक अनियमित कामे करतात त्यामुळे त्याचा आर्थिक बोजा शासनाच्या तिजोरीवर पडतो. यासाठी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना तत्काळ बडतर्फ करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणे माननीय शिक्षण आयुक्त यांना देण्यात यावेत. राज्यातील शिक्षण विभागातील अनियमितता व भ्रष्टाचार रोखण्यासाठी शिक्षण संचालक पदी आयएएस (भा.प्र.से.) अधिकाऱ्यांच्या नियुक्ती कराव्या. आदि महत्वपूर्ण विषयावर चर्चा झाली. सभे करीता कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने प्रशांत मोरे (कार्याध्यक्ष) राजेंद्र वाघमारे (विभागीय अध्यक्ष, अमरावती), किरण मानकर (राज्य उपाध्यक्ष) तुषार आत्राम (अतिरिक्त सरचिटणीस), स्वप्नील फुलमाळी (जिल्हा सरचिटणीस यवतमाळ), संतोष आत्राम (जिल्हाध्यक्ष नागपूर), सौ.वंदना भामरे (राज्य महिला प्रतिनिधी), प्रभाकर पारवे( अतिरिक्त सरचिटणीस) ,सिद्धार्थ मस्के (जिल्हाध्यक्ष, परभणी), श्रीसेल कोरे (राज्य उपाध्यक्ष), सोमलिंग कोरे (जिल्हा सरचिटणीस सोलापूर), गौतम वर्धन (जिल्हाध्यक्ष, कोल्हापूर), बाजीराव प्रज्ञावंत (विभागीय अध्यक्ष कोल्हापूर) इत्यादी राज्यातील संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते या सभेचे इतिवृत्त मंत्रालयातून लवकरच मिळणार आहे. शेवटी सर्वांचे आभार राज्य सरचिटणीस आकाश तांबे यांनी मानून बैठक संपन्न झाली.

---

**पान १ वरून....**

## जमिनीचा वाद प्राणघातक ठरला...

त्याचा विवाह झाला होता. तिचे माहेरही मध्यप्रदेशातील सास (ता.पाली, जि. उमरीया) येथील होते. पत्नी आशोक्तीबाई, मुलगी राशी ( वय १२), मुलगा ओम (वय ६) यांच्यासमवेत एकत्रित कुटुंबात शनीदयाल रहात होता. दि. २३ मे २०२३ रोजी ते सर्व जण गावी मध्यप्रदेशात गेले होते. त्यानंतर दि. २४ जून २०२३ रोजी गावाहून नाशिकला परतले होते. दि. २६ जून २०२३ रोजी आशोक्तीबाई हिने सकाळी लवकर उठून सहा वाजता पतीला कामावर जायचे असल्याने जेवणाचा डबा तयार करुन दिला. त्यानंतर शनीदयाल हा कामावर निघून गेला. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घरमालक आनंद नाठे हे देखील त्याच कंपनीत काम करत होते. त्यांना शनीदयालची 'मुलगी राशी हिने फोन करून सांगितले की 'मेरे माँ का खून बह रहा है, किसीने उसको चाकू मारा है. ही भयानक खबर ऐकून नाठे यांनी शनीदयालला सोबत घेतले आणि ताबडतोब घरी आले. घरात जावून पाहिले असता भयानक दृष्य त्यांना पहावयास मिळाले. आशोक्तीबाई बैगा ही चटईवर उताण्या स्थितीत पडलेली होती. तिच्या गळ्यावर चिरल्याने मोठी जखम झालेली दिसली. त्या जखमेतून रक्त वाहून चटईवर व जमिनीवर रक्ताचे थारोळे साचलेले होते. तिच्या डाव्या पायाच्या मांडीवर घरातील पिवळ्या रंगाची मूठ असलेली सुरी पडलेली होती. तिला रक्त लागलेले होते. यावरून मारेकऱ्याने याच सुरीने तिचा गळा कापून निर्घृणपणे खून केलेला दिसत होता. तिच्या गळ्याजवळील साडीचा भाग व ब्लाऊज रक्ताचे माखलेले होते, तेंव्हा घरमालक नाठे यांनी ताबडतोब समोर असलेले डॉ. शहा यांना बोलावले. त्यांनी तिला तपासून ती मयत झाल्याचे सांगितले. शनीदयाल यांनी मुलांना काय झाले? याबाबत विचारणा केली, तेंव्हा मुलीने मैं उपर के रूम में मोबाईलपे कृष्णा पिक्चर देख रही थी, ओम मेरे साथ था, जब मैं निचे आयी तो माँ का खून बह रहा था असे या घटनेची माहिती सातपूर पोलीस ठाण्याला कळवली. उपायुक्त चंद्रकांत खांडवी, सहाय्यक आयुक्त वसंत मोरे, शेखर देशमुख, पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, पंकज भालेराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज गवारे, हेमंत तोडकर, उपनिरीक्षक श्रीवंत वाघ आदींनी घटनास्थळी धाव घेतली. आयुक्त अंकुश जाधव यांनी घटनेची माहिती येवून मार्गदर्शन केले. दरम्यान शनीदयाल रामजिवामन बैगा (वय ३०) याने दिलेल्या फिर्यादीवरून सातपूर पोलीस ठाण्याला गुन्हा रजि. नं. १८८/२०२३ ला भा.दं.वि. कलम ३०२ खाली गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गवारे यांच्याकडे सोपवण्यात आला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. सातपूर पोलिसांसह शहर गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. पोलिसांनी परिसरातील सी.सी.टी.व्ही.चे फुटेज ताब्यात घेतले असता यात एकही संशयास्पद व्यक्ती आल्याचे दिसले नाही. त्यामुळे मग घरातच वरच्या माळ्यावर रहाणाऱ्या ३३ जणांना चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले. ही चौकशी करत असतांना त्यांच्यापैकी एक असलेला जयकुमार याच्या जबाबात तफावत दिसून आली. तर एका सी.सी.टी.व्ही. तील त्याच्या हालचाली संशयास्पद दिसून आल्यावर पोलिसांनी त्याच्यावरच लक्ष केंद्रीत केली. त्याला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने खुनाची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक केली. जयकुमार परसराम बैगा (वय २६) मूळ रहाणार गिंजरी, बिरसिंगपूर, पाली (मध्यप्रदेश) हल्ली आनंद नाठे यांच्या घरात भाडेकरू म्हणून रहातो. दि. २६ जून २०२३ रोजी सकाळी सहा वाजता शनीदयाल हा कंपनीत कामावर निघून गेला. त्याची दोन्ही मुले वरच्या खोलीत मोबाईलवर सिनेमा पहात बसली होती. ही संधी साधून जयकुमार हा आशोक्तीबाईकडे आला. बोलता- बोलता त्याने तिच्याकडे गावातील जमिनीबाबतचा विषय काढला. त्यावरून त्यांच्यामध्ये वाद झाला. जयकुमारने तिच्याच घरातील सुरीने तिच्या गळ्यावर वार करून तिचा गळा चिरला. यामध्ये ती मरण पावली. यामधील हल्लेखोर हा आशोक्तीबाईचा चुलत सासरा असून त्यांच्यामध्ये जमिनीसंदर्भात वाद होते. आशोक्तीबाईचा पती शनीदयाल हा कामावर गेल्यानंतर जयकुमारने तो वाद उकरून काढत आशोक्तीबाईचा खून केला. सी.सी. टी.व्ही. फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे शहर गुन्हे शाखेच्या युनिट एक व सातपूर पोलिसांनी अवघ्या २४ तासात खुनाची उकल केली व मारेकरी जयकुमारला गजाआड केले. त्याबद्दल तपास पथकाचे आयुक्त अंकुश जाधव यांनी अभिनंदन केले.

## वाळूमाफियाच्या नादी लागून...

भाऊसाहेब निकम व त्याचे साथीदार विना परवाना व बेकायदेशीरपणे मुरूम भरतांना दिसले, त्यामुळे रविंद्र त्यांच्याजवळ थांबला. मुरूम कुठे वाहून घेवून चालला? अशी विचारणा करत मुरूम घेवून जाण्यास त्यांना हटकल्यामुळे त्यांच्यात वाद सुरू झाला. तेंव्हा तू कोण आम्हाला हटकणारा?' असे म्हणत रितेश व त्याच्या माणसांनी त्याला घेरले. शिवीगाळ व दमबाजी करत त्याला लाथा-बुक्क्यांसह मारहाण करायला सुरूवात केली. गुंड प्रवृत्तीचा रितेश व त्याच्या साथीदारांनी रविंद्र याच्यावर लाकडी दांड्याने प्राणघातक हल्ला चढवला. त्याला बेदम मारहाण करण्यात आली. डोक्याला, छातीला, हाता-पायांना गंभीर दुखापती होवून तो खाली कोसळला. त्यानंतर त्यांनी रविंद्रच्या भाऊबंदांना फोन करून, त्याचा अपघात झाला आहे असे खोटे सांगितले. रविंद्रचा अपघात झाल्याचे कळताच त्याचा भाऊ संजय व इतरांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याला प्रथम मालेगावी सामान्य रूग्णालयात व नंतर नाशिक येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या अंगावरील जखमा गंभीर होत्या. तो मृत्यूशी झुंज देत होता, मात्र उपचार सुरू असतांनाच त्याचा मृत्यू झाला. बाळू माफीयांनी एका चांगल्या तरूणाचा बळी घेतल्याने गावात व परिसरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. रितेश हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याची डाबली व परिसरात दहशत आहे, त्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. रितेश आणि त्याच्या साथीदारांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपअधीक्षक पुष्कराज सुर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार आदींनी घटनास्थळी धाव घेवून गुन्ह्याची माहिती घेतली. रविंद्रचा भाऊ संजय शंकर चौधरी याने दिलेल्या फिर्यादीवरून वाळू मार्फीया रितेश भाऊसाहेब निकम व त्याचे साथीदार सोनू रूपचंद पवार, प्रकाश दादा सोनवणे, राकेश दशरथ माळी, प्रशांत महावीर शेलार व राहुल राकेश पाटील या सहा जणांच्या विरोधात वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३०२ व ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच लोकांच्या मागणीनुसार तातडीने सर्व आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेवून गजाआड केले. तेली समाजाचे रमेश उचिन, दया चौधरी, अशोक निकम, पी.के. चौधरी, कमलाकर चौधरी, बाद सैंदाणे, जिभाऊ करंकाळ, राजेश बडवणे, अरूणाबाई चौधरी आदींनी माजी केंद्रीय मंत्री ना. सुभाष भामरे, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दादा भुसे व अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती यांना निवेदन सादर करून या क्रूर व अमानवीय घटनेची गंभीरपणे दखल घेवून आरोपीस जास्तीत जास्त कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली.

## ओळखीचा गैर फायदा घ्यायला ...

उजव्या हाताच्या बोटात पांढऱ्या धातूच्या दोन आंगठा, डाव्या डोळ्याजवल अँकरचे चिन्ह गोंदलेले, मानेवर उजव्या बाजूस ७ पानांचे गोंदण तसेच हाताचे सर्व बोटांवर मध्यभागी विविध चिन्हें गोंदलेली, तर शर्टच्या कॉलर मार्फवर जॅक अँड जॉन् अशी अक्षरे नोंदलेली होती तर पुमाची ट्रॅकपेंन्ट होती, उजवे हाताचे बोटात एक सिंहमुद्रा व एक कासव अशा दोन अंगठया होत्या, अशा वर्णाचा तो मृतदेह पडलेला होता. दरम्यान या गुन्हयातील अज्ञात आरोपीने यातील अनोखी मयत व्यक्तीचा खुन करण्याचे उद्देशाने त्याच्या चेहऱ्यांवर धारदार शस्त्राने व दगडाने प्रहार करून खून केला आहे, अशा आशयाची सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन दराडे यांनी २४ एप्रिल रोजी वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारी वरून वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात गु.र. क्र.१६० /२०२३ कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच वाशी रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी कटारे, पोलीस निरीक्षक सचिन गवते आणि पथकाने घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळची व मृतदेहाची पाहणी केली . रीतसर पंचनामा करून तो मृतदेह शवविच्छेदनासाठी वाशीच्या रुग्णालयात रवाना केला. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त रविंद्र शिसवे, मध्य परिमंडळ, लोहमार्ग, मुंबईचे पोलीस उपायुक्त मनोज पाटील, हार्बर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त देविदास सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली वाशी रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी कटारे, पोलीस निरीक्षक सचिन गवते आणि पथक करू लागले. सुरुवातीला पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न केले. तपासत मृत तरुणाचे नाव जितेश बापु बनसोडे (वय २३) रा. ऐरोली ज्ञानदिप शाळेच्या बाजूला, आदर्श चाळ, रुम नं. बी/४६४ सेक्टर २, ऐरोली पश्चिम, नवी मुंबई येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी जितेशच्या मित्र मंडळीकडे चौकशी केली असता,त्यांनी कानावर हात ठेवले.त्यानंतर जितेश बनसोडेच्या कुटूंबातील सदस्यांकडे विचारपूस केली. जितेशचे कोण्या मुली बरोबर प्रेमप्रकरण, मित्र मंडळीत काही वादविवाद होते का? याबाबत सविस्तर माहिती घेतली मात्र कुटुंबातील सदस्यानी काहीही माहिती नसल्याचे सांगितले. पोलिसांचा तपास सुरू असताना, अशातच गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, जितेश बनसोडे आणि त्याचा मित्र सागर राजु खरटमल (वय २६ ) रा.ऐरोली, नवी मुंबई व १७ वर्षे वयाचा अल्पवयीन साथीदार असे तिघेजण घटनेच्या दिवशी एकत्र होते अशी माहिती प्राप्त झाली. पोलिसांनी त्यांचा शोध घेतला असता ते दोघेही पोलिसांच्या जाळ्यात अडकले.पोलीस ठाण्यात आणून सागर खरटमल व त्याचा १७ वर्षीय अल्पवयीन साथीदार या दोघांची चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. ती पुढील प्रमाणे!

जितेश बनसोडे आणि त्याचा मित्र सागर खरटमल व १७ वर्षे वयाचा अल्पवयीन साथीदार असे तिघेही नवी मुंबईच्या ऐरोली परिसरात राहत होते. ते तिघेही मित्र होते. तिघांना ही नशापाणी करण्याची सवय होती. पार्ट्या करणे, दारू पिणे व मौजमजा करणे आणि भटकणे असा त्यांचा दैनंदिन जीवनातील प्रवास सुरु होता. परंतु काही दिवसांत या मित्रांमध्ये वाद निर्माण झाले. जितेश बनसोडे याने त्याचा मित्र सागर खरटमल व १७ वर्षे वयाचा अल्पवयीन साथीदार या दोघांना मारहाण केली. या प्रकरणी जितेश बनसोडे वर गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु काही दिवसानंतर या तिघांत पुन्हा समझोता झाला. ते पुर्वी सारखे नशापाणी करू लागले. जितेश सोबत समझोता झाला असला तरी सागर खरटमल व १७ वर्षे वयाचा अल्पवयीन मुलाच्या मनातील पूर्वी मारहाण केल्याचा राग होताच. शिवाय जितेश आरोपीच्या बहिणीवर वाईट नजर ठेवून होता.ही गोष्ट ही या दोघांना खटकली होती. या दोन्ही गोष्टीचा राग मनात ठेवून सागर खरटमल व त्याच्या अल्पवयीन मित्राने जितेशचा काटा काढण्याचा बेत आखला.त्यानुसार २४ एप्रिल रोजी या दोघांनी नशापाणी करण्याच्या उद्देशाने जितेश बनसोडे याला वाशी रेलवे स्टेशन ते सानपाडा रेल्वे स्टेशन दरम्यान ब्रिजखाली नेले. तेथे हे तिघेही नशापाणी करण्यासाठी बसले असता, जुन्या भांडणाचा व बहिणीवर वाईट नजर ठेवल्याचा राग मनात ठेवून सागर व त्याच्या मित्राने जितेशला धक्का देऊन खड्यात पाडले. खोल खड्यात पडल्याने जितेश बनसोडे हा बेशुद्ध झाला. त्यानंतर या दोघांनी त्यावर दगडे मारुन खून करुन पळून गेले होते. अशा प्रकारे या दोघांनी खुनाची कबुली दिली. वाशी लोहमार्ग पोलिसांनी आरोपी सागर खरटमल व १७ वर्षे वयाचा अल्पवयीन साथीदार या दोघांना या गुन्ह्यात ४८ तासात अटक केली.

**पान ८ वरून....**

## लातूरकरांचे राष्ट्रवादी पक्षाला कायम...

संघटकपदी शेख जाकीर इब्राहिम तांबोळी व ईराण्णा पावले संघटक सचिव म्हणून मोईन शेख, कायम निमंत्रित : माजी खा.जनार्धन वाघमारे सर, प्रदेश सरचिटणीस बस्वराज नागराळकर पाटील, प्रदेश सरचिटणीस आशाताई भिसे, संजय शेटे, मुफ्ती फय्याज, कार्यकारिणी सदस्य अॅड.बालाजी कुटवाडे, बागवान मिनहाज, अशोक उपासे, अॅड.अप्पाराव पाटील, पठाण जिब्राईल, धुर्वे महादेव व राजाभाऊ सकपाळ, प्रसिध्दी प्रमुख ढवारे उमाकांत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रसंगी प्रा.प्रशांत घार, अॅड.शेखर हविले, अॅड.निशांत वाघमारे, जाकिर तांबोळी व डी.उमाकांत यांच्या सह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेला ...

म्हणून एस व्ही कुलकर्णी, जान्हवी मदने, आदिती मेनकर, प्रेरणा सोरडे, आसावरी कुलकर्णी यांनी काम पाहिले. विजेत्या खेळाडुंचे आशियाई तायक्वांदो महासंघाचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तथा राष्ट्रीय पंच नेताजी जाधव यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी पालक व खेळाडू उपस्थित होते.

## टोमॅटो दरवाढी विरोधात युवक...

नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात युवक कॉंग्रेस प्रदेश सचिव डॉ निलेश झेडगे, महिला कॉंग्रेस शहराध्यक्षा रुक्साना कुरेशी, महिला प्रदेश सचिव रेहाना अन्सारी, सोहेल खान यांसह मोठ्या संख्येने युवक कॉंग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## लातूर येथे अनुसूचित जाती व अनुसूचित...

डॉ. जी. लक्ष्मण (कायदा विद्याशाखा), यांनी राज्यघटने विषयी अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच अॅड. संतोष देशपांडे व अॅड. लक्ष्मण शिंदे यांनी सदर अधिनियम अंतर्गत गुन्हे नोंद करताना पोलीस विभागाने कोणती काळजी घ्यावी. तसेच इतर न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन या सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील १२६ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांना चहा, नाष्टा व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली होती. या प्रशिक्षण कार्यशाळेस प्रकल्प व्यवस्थापक, बार्टी नितिन सहारे, प्रमुख व्याख्याते सुभाष केकन, प्रा.डॉ.जी. लक्ष्मण तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग लातूर, अविनाश देवसटवार, उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तेजस माळवदकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर श्रीमती कल्पना क्षीरसागर, जिल्हा माहिती अधिकारी लातूर युवराज पाटील, अॅड.संतोष देशपांडे ङ लक्ष्मण शिंदे, भागवत फुंदे उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर (शहर), उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर (ग्रामीण), सुनिल गोसावी, कार्यालय अधिक्षक तथा प्रभारी सहायक आयुक्त समाज कल्याण लातूर, ए.एस. लाखाडे, समाज कल्याण निरिक्षक लातूर संदेश घुगे, सचिन गिरमे (बार्टी) व समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थितीत होते. सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व तालुका समन्वयक व समतादुत (बार्टी) यांनी विशेष सहकार्य केले. कार्यशाळेची यशस्वी सांगता झाली. कार्यशाळेचे सुत्रसंचालन तालुका समन्वयक नागेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती ए.एस.लाखाडे यांनी केले व कार्यशाळेचा समारोप नितिन सहारे यांनी केला.

# सराईत दरोडेखोरांच्या टोळी विरोधात मोक्काअंतर्गत कारवाई

## पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनात धाडसी कारवाई

**लातूर/करकरे अंबादास**

आंबेजोगाई रोड, डी मार्ट जवळ असलेल्या अपार्टमेंट वर सशस्त्र दरोडेखोराने दरोडा टाकल्याची माहिती पेट्रोलिंग वरील पोलिसांना समजली होती. त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखा आणि लातूर शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व अमलदारांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून दरोडेखोरांचा पाठलाग करून त्यांना काही तासातच मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले होते. गुन्ह्याचा तपास करीत असताना सदरचे दरोडेखोरांनी लातूर जिल्ह्यात पाच ठिकाणी तसेच महाराष्ट्र राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी टोळी तयार करून सशस्त्र दरोड्याचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले होते. दरोडा, जबरी चोरी सारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली होती. यांच्याकडे गुन्ह्या बाबत सखोल तपास करुन नमूद गुन्ह्यातील आरोपी हे टोळी करून टोळीने गुन्हे करणारे तरबेज, सराईत,धाडसी, कुख्यात व सक्रिय गुन्हेगार असून त्यांनी लातूर जिल्ह्यातील पोलीस ठाणे रेनापुर, पोलीस ठाणे गांधी चौक व विवेकानंदचौक तसेच महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वतःच्या आर्थिक लाभासाठी, संघटितपणे, वेगवेगळे साथीदार घेऊन टोळी निर्माण करून हिंसाचाराचा वापर व कट करून स्वतःचे व टोळीतील साथीदाराचे आर्थिक फायदा करिता सशस्त्र दरोड्याचे गुन्हे करणे, जीवे मारणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घातक हत्याराने दुखापत करून लोकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण केल्याचे निष्पन्न झालेने त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी नमूद आंतरजिल्हा दरोडेखोरांच्या टोळीविरुद्ध मोक्का (MCOC) सारख्या कठोर कायद्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी सदरील दरोडेखोराविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ (MCOC) अन्वये कलम वाढ करण्याबाबत परवानगी मिळण्यासाठी चा प्रस्ताव पाठविलेला होता . पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटित गंभीर गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुद्ध मोक्का अंतर्गतची ही लातूर जिल्ह्यातील अलीकडच्या काळातील दुसरी मोठी कारवाई आहे. सदर गुन्ह्यातील नमूद आरोपी महेश आसाराम चव्हाण, राहणार गेवराई, नितीन संजय काळे उर्फ बापू टांग्या काळे, राहणार अहमदनगर, विकास रामभाऊ भोसले, राहणार बीड, रवींद्र संजय काळे, राहणार अहमदनगर, लक्ष्मण पांडुरंग भोसले, वय ३० वर्ष राहणार, उमापूर तालुका गेवराई जिल्हा बीड (फरार) एक विधी संघर्ष बालक असे आहेत.

गुन्ह्याचा पुढील तपास विशेष पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड डॉ.शशिकांत महावरकर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉक्टर अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे,यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक बालाजी गोणारकर, विधी सल्लागार ॲड.सारिका वायबसे, पोलीस अंमलदार संतोष खांडेकर, पांडुरंग सगरे यांनी केली आहे.

## देवणी खुर्द येथे शंखी गोगलगाय विषयावर शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक प्रितम कारभारी यांनी केले मार्गदर्शन!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील देवणी खुर्द येथे शेतकऱ्यांना शंखी गोगलगाय विषयावर सखोल मार्गदर्शन देण्यात आले. जर शेतकऱ्यांना शेतामध्ये गोगलगायचे जास्त प्रमाण दिसून येत असतील तर शेतकऱ्यांनी शेतामध्ये असलेले गोगलगाय वेचून बाहेर टाकावे, बांधाच्या बाजुणे चुना टाकावे त्यामुळे गोगलगाय आत येऊ शकत नाहीत. एक गोगलगाय पाच वर्षे जिवंत राहू शकते. गोगलगाय दिडशे अंडी घालते अशी सखोल माहिती देवणी कृषी कार्यालयातील कृषी सहायक प्रितम कारभारी यांनी शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शेतकरी बांधवा सह गावातील सरपंच यशवंत कांबळे, अनिल कांबळे, रतन गरड, संजय गरड, माधव रणदिवे, राजाराम गरड, बापुराव येणगे, संजय गरड, प्रभुराव काकनाळे, तुकाराम पाटे, राजकुमार गरड, सहदेव मुराळे, कृष्णा मूराळे, प्रवीण गरड,रामराव धनासुरे, सीताराम रणदिवे, राजेंद्र पाटील, तानाजी चामे, नितीन बिरादार, लक्ष्मण पिनाटे, धोंडीराम गरड, रमेश मूराळे, व्यंकट उगीले, शहाबुद्दीन पठाण, अर्जुन मुराळे आदींची उपस्थिती होती.

## बस स्थानकावर चोरी करणारी सराईत महिलेला केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील विविध एसटी स्टँडवर महिला प्रवाशांचे दागिने चोरणारी सराईत महिला गुन्हेगाराला जेरबंद करून पोलिसांनी त्याच्याकडून ३ लाख ४६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील तालुका ठिकाणच्या एसटी स्टँडवर महिलांचे दागिने चोरीचे गुन्हे दाखल झाले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे यांच्या पथकाने अक्कलकोट, मोहोळ, बार्शी, पंढरपूर, टेंभुर्णी, अकलूज आदी ठिकाणच्या एसटी स्टँडवर भेट देऊन संशयीत आरोपींची माहिती प्राप्त केली. दरम्यान मोहोळ एसटी स्टँडवर चोरी करणारी महिला नई जिंदगी (सोलापूर) येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता ग्रामीण भागातील विविध एसटी स्टँडवर चोरी केल्याची कबुली तिने दिली. तिच्याकडून एकूण ३ लाख ४६ हजार ७०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. सदर महिलेला अटक करण्यात आली असून ती सध्या मोहोळ पोलीस ठाण्याच्या कोठडीत आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, पोलीस उपनिरीक्षक राजेश गायकवाड, सहाय्यक फौजदार श्रीकांत गायकवाड, नीलकंठ जाधवर, हवालदार सलीम बागवान, विजय भरले, मपोहेकॉ मोहिनी भोगे, पोना रवी माने, मपोना पल्लवी इंगळे, ज्योती काळे, हरिदास पांढरे यांच्या पथकाने केली आहे.

## वाडा तालुका पत्रकार संघ व अभ्यास ॲकॅडमीच्या वतीने नूतन जाधव हिचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

सामान्य कुटुंबातून जन्माला आलो या गोष्टीचा बाऊ न करता परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करा, आपण ग्रामीण भागातील विद्यार्थी असल्याचा न्यूनगंड बाहेर काढून, ध्येय ठरवून अभ्यासाला लागलो तर यश निश्चित मिळते असे प्रतिपादन नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पास करून पोलीस उपनिरीक्षक पदी नेमणूक झालेल्या नूतन जाधव हिने केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना वाडा येथे आयोजित एका कार्यक्रमा दरम्यान ती बोलत होती. आधुनिक जगात मोबाईल महत्त्वाचे माध्यम असले तरी त्याचा योग्य उपयोग शैक्षणिक सुबकता वाढविण्यासाठी करावा, कारखान्यात काम करून हल्ली जीवन चालविणे अवघड असून आता परिश्रम घेतले तर पुढील आयुष्य सुकर करता येईल, मौजमस्ती जीवनातील भाग असला पाहिजे तसेच प्रेम ही भावना मोलाची आहे मात्र त्यासाठी योग्य वेळ निवडता आली पाहिजे असेही नूतन हिने विद्यार्थ्यांना संबोधित करतांना सांगितले. वाडा येथील अभ्यास अक्ॅडमी व वाडा तालुका पत्रकार संघ यांच्या वतीने नूतन जाधव हिचे मार्गदर्शन शिबिर आयोजित केले असून यावेळी नूतन हीचा पत्रकार मच्छिन्द्र आगिवले, संजय लांडगे व सचिन भोईर पुष्प शाल, पुष्प गुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते यावेळी गुणवान विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

## मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणार -सपोनि प्रशांत हुले

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यात असलेल्या मंद्रूप पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैद्य व्यवसायावर नियंत्रण ठेवून या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू अशी ग्वाही देऊन मुलींची आणि महिलांची छेड काढणाऱ्या रोड रोमिओवर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा मंद्रूपचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत फुले यांनी यावेळी बोलताना दिली. तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांची बदली सोलापूर शहर पोलीस दलात झाली असून, त्यांच्या जागी सांगोला पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले प्रशांत हुले यांची नियुक्ती झाली आहे. नुकताच त्यांनी आपला पदभार स्वीकारला यावेळी बोलताना हुले म्हणाले, मंद्रूप पोलीस ठाण्याचे हद्दीत तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या ऑपरेशन परिवर्तन ही मोहिम आपण प्रभावीपणे राबविणार आहोत. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वच गावात पूर्वीप्रमाणेच कायदा व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## महसूल आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या उपस्थितीत कोकण महसूल विभागाचा आढावा

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



कोकण विभागातील महसूल विभागाच्या प्रलंबित कामांना जिल्हाधिकारी यांनी गती दयावी. राज्यात कोकण विभागाचे काम अव्वल करावे, अशा सूचना महसूल आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या. आज विभागीय आयुक्त कार्यालयात डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील जिल्हाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उपायुक्त (महसूल) मकरंद देशमुख, उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे, मुंबई शहर जिल्हाधिकारी राजीव निवतकर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिणगारे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, रायगड जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, रत्नागिरी जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह आणि सिंधुर्दूग जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी आदी उपस्थित होते. या बैठकीत ऑनलाईन सातबारा, फेरफार नोंदणी, भूसंपादन, कांदळवन प्रकरण, शासन आपल्या दारी, नवीन वाळूधोरण, महाराजस्व अभियान, सलोखा योजना, मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्पासाठी जमीन, गावठाण संबंधित प्रश्न, ई-पिक पाहणी, ई-चावडी, ई-रेकॉर्ड, ई-मोजणी, प्रगती पोर्टल, पीजी पोर्टल, शहराच्या हद्दीतील सातबारे बंद करणे, पुरवठा शाखेतील विविध विषय, भूसंपादनातील प्रलंबित प्रश्न या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**कोकण विभागात दिव्यांगांच्या दारी शासन योजना**

महाराष्ट्राच्या दिव्यांग विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू, यांच्या सूचनेनुसार कोकण विभागातील सर्व जिल्हयांमध्ये दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिव्यांगांच्या दारी शासन हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रत्येक तालुका पातळीवर नोंदणीकृत दिव्यांगांना शासनाचा लाभ कसा देता येईल. या बाबत महसूल यंत्रणांनी काम करावे,अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. सर्व सामान्यांच्या प्रश्नाप्रमाणेच दिव्यांगांचे प्रश्नही महत्वाचे आहेत. ते अधिकाऱ्यांनी संवेदनशील प्रकारे हाताळण्याची आवश्यकता असल्याचे महसूल आयुक्तांनी यावेळी सांगितले.

## रोटरी क्लब ऑफ बॉम्बे सेंट्रलने वाडा ग्रामीण रुग्णालयाला पत्र्याचा निवारा

**वाडा/प्रतिनिधी**



ग्रामीण रुग्णालय वाडा येथे दररोज बाह्य विभागात ३५० ते ४०० रुग्ण, गरोदर महिला, बालकांसह त्यांचे नातेवाईक ग्रामीण भागातून उपचारासाठी येत असतात. बाह्यरुग्ण विभागाबाहेर केसपेपर आणि तपासणी करीता कडक उन्हात आणि मुसळधार पावसातही या सर्वांना रांगेत उभे राहावे लागत होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची ही समस्या दूर करण्यासाठी रांगेसह पत्र्याचे शेड उभारण्याची विनंती रोटरी क्लब ऑफ वाडा कडे २७ जून रोजी केली होती. वाडा क्लबचे संस्थापकीय अध्यक्ष शशांक ठाकरे आणि मुंबई दहिसर क्लबचे राजेंद्रन उन्नीकृष्णन यांच्या प्रयत्नातून रोटरी क्लब ऑफ बॉम्बे सेंट्रल च्या अध्यक्षा काजल थडानी यांनी यासाठी मदत केली आणि २८ जून रोजी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला. रोटरी क्लब ऑफ वाडाचे अध्यक्ष शशिकांत दुर्गुडे, सेक्रेटरी - हृषीकेश पाटील, रोटरी सभासद-प्रफुल बोकन्द, वैशाली दुर्गुडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वनाथ दसरे, डॉ.विजय ठाकरे, यांच्या उपस्थितीत ४ जूलै रोजी कामाचा शुभारंभ होवून १० जूलै पासून हे शेड नागरिकांकरिता वापरण्यास उपलब्ध करून देण्यात आले. रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांची मोठी गैरसोय दूर केल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रल च्या अध्यक्षा काजल थडानी आणि त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजेंद्रन उन्नीकृष्णन आणि वाडा क्लबच्या सदस्यांचे वैद्यकीय अधिकारी आणि नागरिकांनी आभार मानले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात नवनियुक्त कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांचा संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), महाविद्यालयाचे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक प्रा.जी.एम.धाराशिवे, ॲड.काशिनाथ साखरे, प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव, स्टाफ सेक्रेटरी कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, समाजकार्य विभागप्रमुख डॉ.दिनेश मौने, पर्यवेक्षक प्रा.शिवशरण हावळे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय समोरील महात्मा बसवेश्वर यांच्या सिंहासनारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे लातूर शहरातील एक नामांकित महाविद्यालय असून या महाविद्यालयामध्ये ग्रामीण भागातील व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे कार्य केले जाते याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून डॉ.संजय गवई यांची प्रभारी प्राचार्यपदी संस्थेने नेमणूक केली त्याबद्दल सर्व संस्था पदाधिकाऱ्यांचे त्यांनी आभार मानून प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई म्हणाले की, आपली कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळामध्ये निवड या बद्दल आम्हाला आनंद झाला आहे. आपल्याबद्दल लातूरकरांमध्ये आपुलकी आणि प्रेमाची भावना आहे. आज आपण आमच्या महाविद्यालयामध्ये येऊन सत्कार स्वीकारला त्याबद्दल त्यांनी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांचे आणि महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले.



## भिवंडी महानगरपालिकेचा आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांनी स्वीकारला पदभार!

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नियुक्त झालेले अजय वैद्य व अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती झालेले विठ्ठल दिगंबर डाके यांनी नुकताच पालिका मुख्यालयात आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. भिवंडी पालिका आयुक्त म्हणून असलेले विजयकुमार म्हसाळ यांची नवीमुंबई महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त पदी बदली झाली असून त्यांच्या जागी राज्य कर सह आयुक्त संवर्गातील अजय वैद्य यांची नियुक्ती केली होती.तर अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांची बदली पदोन्नती देऊन इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त पदी नियुक्ती केली गेल्याने रिक्त झालेल्या पदी पनवेल महानगर पालिकेतील विठ्ठल दिगंबर डाके यांची नियुक्ती केली गेली.या दोघांनी भिवंडी पालिका मुख्यालयात आपला पदभार स्वीकारला. नवनियुक्त आयुक्त अजय वैद्य व अतिरिक्त आयुक्त विठ्ठल दिगंबर डाके यांचे उपायुक्त दीपक झिंजाड व प्रणाली घोंगे यांनी स्वागत केले. तर पालिकेतील आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांसोबत उपायुक्त (मुख्यालय ) दीपक पुजारी यांची उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, नवी मुंबई,येथे तर उपायुक्त नूतन खाडे यांची मालेगाव महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त पदी बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यात आला.

क्राईम Reporter
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, जळगाव, सांगलीतील बातम्या व गुन्हेकथा या क्रमांकावर पाठवा
9 8 9 0 7 1 8 8 7 3

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

# भिवंडीत टोरंट पावर कंपनी विरोधात तीव्र आंदोलन

## भर पावसात महिलांसह शेकडो नागरिक रस्त्यावर



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीत वीज वितरण करणाऱ्या टोरेंट पावरच्या मनमानी कारभारा विरोधात सर्वपक्षीय टोरंट हटाव संघर्ष समितीच्या वतीने शुक्रवारी दुपारी तीव्र आंदोलन करण्यात आले. शुक्रवारी सकाळपासून भिवंडीत मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. या मुसळधार पावसातही ग्रामीण भागातील शेकडो महिला व पुरुष या आंदोलनात सहभागी झाले होते. भिवंडी महापालिकेच्या समोर असलेल्या स्व.धर्मवीर आनंद दिघे चौकातून दुपारी तीन वाजता या आंदोलनास सुरुवात झाली होती.

धर्मवीर चौक ते न्यू कनेरी येथील टोरेंट पॉवरच्या कार्यालयावर हा मोर्चा धडकला होता.यावेळी टोरेंट पॉवरच्या विरोधात आंदोलकांनी तीव्र घोषणाबाजी करत टोरंट हटाव भिवंडी बचाव, नही चलेगी नही चलेगी टोरंट की दादागिरी नही चलेगी या व अशा घोषणा देत टोरंट पावर कंपनीस असलेला विरोध दर्शविला. हा मोर्चा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा अथवा नेत्याचा नसून सर्वसामान्य नागरिकांचा मोर्चा असल्याची प्रतिक्रिया यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिली. तर कामगार नगरी असलेल्या भिवंडीत कामगारांचा पगार सात हजार तर वीज बिल व त्यावरील दंड दहा हजार असा प्रकार आहे त्यामुळे आम्ही नागरिकांनी खायचे काय असा संतप्त सवाल मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी केला. टोरंट कंपनीचा शहर व ग्रामीण भागात मनमानी कारभार सुरु असून, जास्त वीज बिल आकाराने, सक्तीने वीज बिल वसूल करणे, वीज चोरी बाबत नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करणे या व अशा अनेक जाचाला कंटाळून भिवंडीत शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी एकत्र येत हा लढा उभारला असून आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर येत्या पंधरा दिवसात विधानभवनावर मोर्चा नेऊ असा इशारा देखील यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला. त्यांनतर कृती समितीच्या शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन टोरंट पावर कंपनीच्या व्यवस्थापनाकडे सोपविला. सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसात ही आंदोलनकर्ते रस्त्यावर ठाण मांडून उभे होते.

कल्याण नाका येथे रस्त्यावर रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने आंदोलनकर्त्यांना या साचलेल्या पाण्यातूनच जावे लागले तर रस्त्याच्या कडेला असलेल्या उघड्या चेंबरमध्ये काही आंदोलनकर्ते पडल्याने आंदोलकांनी मनपा प्रशासनाचाही तीव्र निषेध केला. या आंदोलनामुळे शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. तर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे व सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा स्थळी चोख असा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# विद्यार्थिनी व पोलिसांतील संवाद सुलभ व्हावा-पल्लवी बाणे



**वाडा/प्रतिनिधी**

सायबर क्राईमचे गुन्हेचे जास्त करून तरुण वर्गामध्ये घडत असून तरुण वर्ग विशेषतः मुली याला जास्त बळी पडत असल्याने मुलींना जागरूक करण्यासासाठी व विध्यार्थिनी व पोलिसांतील संवाद सुलभ व्हावा यासाठी जनसंवाद अभियान राबवला जात असल्याचे मत पोलीस उपनिरीक्षक पल्लवी बाणे यांनी व्यक्त केले. त्या वाडा येथे युवती स्वसंरक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होत्या. सदर कार्यक्रमास विध्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, त्यांनी बाणे यांच्याशी संवाद साधून आपल्या समस्या मांडून त्याचे निरसन करून घेतले. तर पोलिसांची ११२ नंबरची सेवा कोणासाठी, कशी आणि किती वेळात उपलब्ध होते याविषयी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास खरमाटे यांनी दिली. शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे डॉ.शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग, शिक्षक संचालित शिक्षण संथा यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाबाई स्वसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्राचार्य किशोरी भगत, महिला व बाल विकास विभाग, वाडा अस्मिता बिर्जे, संस्थेचे सरचिटनीस विशाल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास खरमाटे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक जयश्री कवटेकर यांनी केले.

# विजेच्या धक्क्याने ७ शेळया व मेंढ्यांचा मृत्यू



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील गातेस येथे विजेच्या तुटलेल्या तारेला चिपकून ७ मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गातेस येथील शेतकरी रमेश गोतारने यांच्या जवळपास ४० शेळ्या -मेंढ्या असून ते सोमवारी (दि. १० जुलै) सकाळच्या सुमारास गावाकडून वैतरना नदीकडे आपल्या शेळ्यामेंढ्या चरण्यासाठी घेऊन जात होते. मात्र काही मेंढ्या पळत पुढे जात असताना एक चालू विजवाहिनी तुटून खाली पडलेल्या विजवाहिनीला स्पर्श झाल्याने त्यातील ७ मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. पैकी काही मेंढ्याना वाचविण्यात त्यांना यश आले. या आधी देखील याच गावात एका म्हशीचा पडलेल्या विजेच्या तारेचा शॉक लागून मृत्यू झाला होता. तर मागील वर्षी २ शेतकरी शेतात पडलेल्या विजेच्या तारेचा शॉक लागून जखमी झाले होते. विद्युत महामंडळाच्या भोंगळ कारभारचा फटका नेहमीच शेतकऱ्यांना बसत आला आहे. मात्र आजपर्यंत खूपच कमी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळाली आहे. वाडा पोलीस स्टेशन, तलाठी तसेच विद्युत महामंडळा कडून या मृत शेळ्यांचा पंचनामा करण्यात आला असून लवकरात लवकर भरपाई मिळावी अशी मागणी पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.

# लातूरकरांचे राष्ट्रवादी पक्षाला कायम सहकार्य लाभत आले आहे -राजा मणियार

**लातूर/प्रतिनिधी**




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला लातूरकरांचे कायम सहकार्य लाभत आले आहे. ते यापुढेही लाभत राहील, असा विश्वास राष्ट्रवादीचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांनी शुक्रवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. यावेळी त्यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनियुक्त शहर जिल्हा कार्यकारिणीचीही घोषणा केली. नूतन शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यावेळी बोलताना म्हणाले की, पक्षाने आपल्यावर अत्यंत कठीण काळात सोपविलेली जबाबदारी आपण सर्वांच्या सहकार्याने की सक्षमपणे पेलण्याचा प्रयत्न करू. शहर जिल्हा कार्यकारिणीत आपण सर्वच घटकातील सदस्यांना सामावून घेऊन एक सर्वसमावेशक कार्यकारिणी निवडली आहे. लातूर शहरातील अगदी बोटांवर मोजण्याइतपत कार्यकर्ते अजित पवारांसोबत गेले असून उर्वरित सर्वच्या सर्व कार्यकर्ते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून राष्ट्रवादीमध्येच असल्याचे मणियार यांनी सांगितले. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत पक्ष ज्याप्रमाणे आदेश देईल त्याप्रमाणे आपण सर्व ताकदीनिशी निवडणूक लढवून पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले. अजित पवारांसोबत गेलेल्या कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांच्याबद्दल बोलताना त्यांनी बनसोडे यांच्या विजयासाठी सहकार्य करणाऱ्यांसोबत त्यांनी प्रतारणा केली असून त्यांचा हिशेब जनताच करेल असे सांगितले. राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस संजय शेटे यांनी यावेळी बोलताना स्वतःला वाचवण्यासाठी अजित पवार काही सहकार्यांना घेऊन भाजपसोबत सत्तेत गेल्याचे सांगितले. शरद पवारांच्या विचारांशी प्रामाणिक असणारे कार्यकर्ते आजच नव्हे तर कायम शरद पवार यांच्यासोबतच आहेत. पक्ष सोडून गेलेल्याना आमच्या परवानगीशिवाय शरद पवार यांचा फोटो लावायचा अधिकार नाही. असे कृत्य करणाऱ्यांवर आपण गुन्हे दाखल करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी राजा मणियार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची शहर जिल्हा कार्यकारिणी घोषित केली ती अशी : उपाध्यक्ष माजी नगरसेविका सौ.छायाताई चिंदे, फिरोज सय्यद, शेख फारूख, अ‍ॅड.वसंत उगले, पप्पु कासले, शेख इरफान, शेख मुस्तफा, विक्रम कदम, जमील नाना, शेख उस्मान, केशव कातळे, शेख शकिल अमीर हमजा, बाळासाहेब सिरसाठ, शेख समीर अमीरसाब. सरचिटणीस : माजी नगरसेवक विनोद रणसुभे, अ‍ॅड.शेखर हविले, अ‍ॅड.प्रदिप पाटील, कोषाध्यक्ष बस्वेश्वर रेकुळगे, सचिव माजी नगरसेविका इरशाद मौलाना तांबोळी, शेख इब्राहिम, जोशी राजकुमार, बरकत शेख, असदमामू खोरीवाले, धुळाप्पा आरबळे, फेरोज पठाण, शेख मतीन, विशाल देवकते, सय्यद जाकीर, पटेल इक्बाल, माजी नगरसेविका अनुसयाताई सुदावळे, सहसचिव माजी नगरसेविका सौ.शोभाताई महादेव धुर्वे,ढाले राहुल,पठाण शहादत, किशोर कांबळे, पठाण फय्याज, ...पान ६ वर

## देवणी येथील घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार स्वामी एजन्सीच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करा!

# विविध पक्ष व सामाजिक संघटनेचा ‘हलगी मोर्चा’ व ‘रास्ता रोको’

**देवणी/शकील मनियार**



देवणी नगर पंचायत घनकचरा व्यवस्थापन विभागात गेली सात वर्षे स्वामी एजन्सी काम करीत असून या विभागात काम करणाऱ्या कंत्राटी मजूराना किमान वेतन कायदा लागू असतांना या मजुरांना केवळ सहा हजार मजुरी देऊन त्यांची लूट केली जात आहे. त्यांच्या हक्काचा पीफ गेली सात वर्षापासून बँकेत जमा न करता जवळपास चाळीस पन्नास लोकांचे पीफ हडप केले आहे. मागील सात वर्षाचे पीफ व शासकीय नियमानुसार फरकाची वेतन रक्कम देण्यात यावी शासकीय नियमानुसार सुरक्षकीट देण्यात यावे आमचा विमा उतरविण्यात यावा या मागणीसाठी कंत्राटी मजूर कामगार यांनी नगर पंचायतीपुढे पन्नास पंचावन्न कामगारांनी आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला अपक्ष नगरसेवक अमित सूर्यवंशी यांनी पाठिंबा देऊन कंत्राटी मजूर कामगार यांना न्याय मिळावा म्हणून मजुरांचे प्रतिनिधीत्व केले होते एक महिन्याच्या आत तुमच्या पूर्ण मागण्या मान्य करू म्हणून मुख्यधिकारी यांच्या समोर आश्वासन देऊन उपोषण उठविण्यात आले होते. या उपोषण दरम्यान दिलेल्या मजुरांच्या कोणत्याही मागण्या या स्वामी एजन्सीने मान्य केल्या नाहीत सर्व नियम धाब्यावर बसवून ही एजन्सी भ्रष्ट व अनागोंदी कारभार करीत आहे कंत्राटी मजुरांना दिलेला शब्द सदर एजन्सीने पाळला नाही म्हणून नगर पंचायतीचे विद्यमान नगरसेवक यांनी चारपाच दिवस उपोषण करूनही गेंड्याची कातडी पांघरूण झोपेचे सोंग घेणाऱ्या भ्रष्ट एजन्सीला जागे करून यांचा परवाना रद्द करा मजुरांचे रक्त शोषण करणाऱ्या स्वामी एजन्सी यांच्यावर कार्यवाही करावी. या प्रमुख मागणीसाठी नगरसेवक अमित सूर्यवंशी यांनी चार पाच दिवस उपोषण करूनही यांची प्रशासनांनी दखल घेतली नाही म्हणून अमित सूर्यवंशी यांच्या समर्थनार्थ श्रमिक हक्क अभियान प्रमुख ज्ञानेश्वर सूर्यवंशी, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा शहराध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, शिवसेना, शिंदे गटाचे पप्पू सूर्यवंशी निराधाराची पुनर्वसन संघटनेचे वसंतराव बिबीनवरे व समाजाच्या वतीने हलगी मोर्चा काढून निषेध नोंदविला एवढे करूनही ही एजन्सी या मजुरांच्या प्रश्नाकडे गंभीरपणे बघितले जात नाही या भ्रष्ट एजन्सीला कोणाचा अभय आहे सात वर्षे मजुरांची लूट करणाऱ्या एजन्सीच्या विरोधात कामगार आयुक्तांकडे दाद मागणार असल्याने सामाजिक संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे सदर एजन्सीचे मालक नेमके कोण यांचा पता कंत्राटी मजूर कामगार यांना नाही ही कामे दलाला मार्फत करून घेत आहेत हे दलाल नेमके कोण याचीही चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

# जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी**

श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शैलेशजी लाहोटी यांच्या वाढदिवसानिमित्त अत्रिवरद प्रतिष्ठान च्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री केशवराज विद्यालय लातूर येथे सब जुनिअर आणि जुनिअर वयोगटात स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेनंतर विजेत्या स्पर्धकांना मेडल्स देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी अत्रिवरद प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रविण शिवनगीकर यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार विनोद चव्हाण, सौ पुजा देशमुख, सौ विजयालक्ष्मी माले, सौ मोना अग्रोया, शिवाजी सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत विश्वजीत जाधव, प्रथमेश सोमवंशी, यश मठपती, अब्राहम सय्यद, अभिषेक अग्रोया, श्रीगणेश खडबडे, अनुश्री कुलकर्णी, प्रगती सोमवंशी, माहिरा सगरे, श्रिया कदम, दुर्वा बिडवे, श्रेया गोरे, सानवी कदम, आरोही राऊतराव, आद्या माले, सिद्धी अग्रोया यांनी प्रथम तर विवांशी अंदुरे, श्रावणी खडबडे, विराज देशमुख, विर जाधव, अनिकेत बिराजदार यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले.स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक सुनील मुनाळे, शैलेंद्र डावळे, अमित होनमाळे, अमोल देशमुख, प्रशांत शिंदे, विवेक डोंगरे, प्रकाश जकोटिया, आशिद बनसोडे आदींनी परिश्रम घेतले. स्पर्धेचे पंच ...पान ६ वर

# टोमॅटो दरवाढी विरोधात युवक काँग्रेसची निदर्शने



**भिवंडी/अभिजित हिरे**

राज्यात सध्या भाजीपाल्याचे भाव वाढलेले असताना टोमॅटो किरकोळ बाजारात १२५ ते १५० रुपये किलो दराने विकला जात असल्याने राज्य शासनाने इतर राज्यातून स्वस्तातील टोमॅटो खरेदी करून राज्यातील नागरिकांना उपलब्ध करून देण्याची गरज असताना तिघा पक्षांचे महायुती सरकार मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप या कामातच व्यस्त असल्याने त्याचा निषेध करण्यासाठी भिवंडीत युवक काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष राहुल छगन पाटील यांच्या नेतृत्वा खाली युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस कार्यालय बाहेर राज्यशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत टोमॅटो दरवाढीचा निषेध नोंदवला आहे. युवक काँग्रेस शहराध्यक्ष राहुल पाटील यांच्या ...पान ६ वर

# लातूर येथे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**



अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे व सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत तालुका व जिल्हास्तरीय एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. प्रशिक्षण कार्यशाळा दि.१४/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.१५ वाजेपर्यंत कार्यशाळेचे स्थळ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, डाल्डा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर येथे आयोजित करण्यात आलेली होती. या प्रशिक्षण कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पन करुन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आली. सदर कार्यशाळेचे अध्यक्ष प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग अविनाश देवसटवार लातूर यांनी प्रस्ताविक केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), सुभाष केकन यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६, बाबत सखोल असे मार्गदर्शन केले. प्राध्यापक दयानंद विधी महाविद्यालय लातूर ...पान ६ वर

# तनुजा शिंदे गाजवते लावणीचा लातूर पॅटर्न

**लातूर/प्रतिनिधी**



ढोलकीच्या तालावर हा कार्यक्रम कलर्स मराठी वाहिनीवर दर शनिवार आणि रविवार सायंकाळी नऊ वाजता प्रदर्शित होतो या कार्यक्रमात महाराष्ट्रातून बारा लावण्यवतीची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मराठवाड्यातून फक्त लातूरची कन्या तनुजा शिंदे ची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे परीक्षण प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक आशिष पाटील, अभिनेत्री क्रांती रेडकर, दिग्दर्शक अभिजीत पानसे करीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून तनुजाचे कौतुक करण्यात येत आहे. यापूर्वी तनुजाचे दोन मराठी चित्रपट प्रदर्शित झालेले आहेत, (१-छंद प्रीतीचा २) हरी ओम) नृत्य स्पर्धेमध्ये तीनशे हून अधिक पारितोषिके पटकावली आहेत. नृत्य क्षेत्रातमहाराष्ट्र भूषण पुरस्कारआणि लातूर रत्न पुरस्कारमिळविला आहे त्याचबरोबरइंडिया की दुल्हनियाया मॉडलिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. मिस रंगरेज २०२२ हे टायटल मिळविले आहे. वेगवेगळ्या नाटकांमध्ये तनुजाने भूमिका पार पाडल्या आहेत.